
बी.एम. प्रतिष्ठान
बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के




बीड | रविवार,दि.६ एप्रिल २०२५ | वर्ष४थे | अंक२३४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# नेत्यांना तुरुंगात टाकण्याचे नियोजन



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेचा खळबळजनक आरोप ◆ कार्यकर्ता घरात नाही तर लोकांच्या दारात शोभतो ◆ जनतेने आम्हाला ऐतिहासिक विजय मिळवून दिला ◆ विरोधकांचे अनेक डाव आम्ही उधळून लावले

पुण्यभूमी प्रतिनिधी

कोल्हापूर:राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापूरातील एका कार्यक्रमात पुन्हा एकदा महाविकास आघाडीला लक्ष्य करत गंभीर आरोप केले आहेत. लोकसभा निवडणुकीत फेक नॅरेटीव्ह पसरवून विजय मिळवणाऱ्या महाविकास आघाडीने विधानसभा निवडणुकीतही विजय मिळवू या विश्वासाने महायुतीच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्याचे नियोजन केल्याचा आरोप शिंदे यांनी केला आहे.कोल्हापूरातील सरवडे येथे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की,बाळासाहेब सांगायचे कार्यकर्ता घरात नाही तर लोकांच्या दारात शोभून दिसतो. एकनाथ शिंदेने या अडीच वर्षांच्या काळात हेच काम केले. मी लोकांमध्ये रमणारा आहे. गेल्या अडीच वर्षात केलेल्या कामची पावती जनतेने दिली.या विधानसभा निवडणुकीत जनतेने ऐतिहासिक विजय मिळवून दिला. लोकसभेमध्ये फेक नॅरेटीव्ह पसरवले. संविधान धोक्यात आहे, आरक्षण जाणार अशा खोट्या गोष्टी पसरवल्यामुळे आमचे संजय मंडलिक त्यात अडकले. त्यांना वाटले विधानसभा निवडणुकीतही असेच करू. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाचे वाटप केले आणि म्हणाले, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांना जेलमध्ये टाकू. त्यांना बर्फाच्या लादीवर झोपवून मारू. एवढी हवा त्यांच्या डोक्यात गेली होती, असा दावा उपमुख्यमंत्र्यांनी केला.

### कोल्हापूरी जोडा दाखवला

पुढे बोलताना एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीणसारख्या योजनांमध्ये विरोधकांनी खोडा घातल्याचा आरोपही केला. ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीवेळी ज्यांनी या योजनेमध्ये खोडा घातला होता, त्यांना तुम्ही चांगला कोल्हापूरी जोडा दाखवला. महायुतीचे सरकार आले. आजही आमची टीम तिच आहे. देवेंद्रजी, मी आणि अजित दादा.

### लोकसभेत धुव्वा

दरम्यान गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने महायुतीचा धुव्वा उडवत राज्यातील ४८ पैकी २९ जागा जिंकल्या होत्या. यामध्ये सर्वाधिक १३ जागा काँग्रेस, ९ जागा शिवसेना आणि ७ जागा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांनी जिकल्या होत्या. तर महायुतीच्या वाट्याला अवघ्या १८ जागा आल्या होत्या. यामध्ये सांगलीतून विशाल पाटील अपक्ष म्हणून विजयी झाले होते.

### विधानसभेत महायुतीचे पुनरागमन

मात्र, त्यानंतर ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने दमदार पुनरागम करत सत्ता कायम राखली होती. यामध्ये सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या भाजपाचे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री तर अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री झाले.

## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी आंदोलन

### वंचित: राज्यव्यापी स्वाक्षरी मोहीमेस बीडमध्ये सुरुवात

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:आज बीडमध्ये सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन भव्य निदर्शने पूज्य भन्तेजी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. त्यावेळी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड.प्रकाश आंबेडकर व प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्या आदेशान्वये स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. यावेळी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने महाबोधी महाविहार मुक्ती





आंदोलनामध्ये मी सहभागी असल्याचा सेल्फी पॉइंट तयार करण्यात आला. त्यास प्रचंड प्रतिसादही मिळाला आणि स्वाक्षरी मोहिमेला गती मिळाली यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष उमेश तूळवे, सह–संघटक अर्जुन जंवजाळ, बीड तालुका अध्यक्ष किरण वाघमारे, बीड शहराध्यक्ष लखन जोगदंड मिलिंद सरपते, युवा नेते प्रेम कांबळे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित ⏩ पान २ वर

## काँग्रेसचा खरा चेहरा झाला उघड

### प्रकाश आंबेडकर:भाजप = काँग्रेस! तेलंगणात आरक्षण रद्द

पुण्यभूमी प्रतिनिधी

नगर:तेलंगणा लोकसेवा आयोगाच्या (TGPSC) प्राथमिक परीक्षेमधून आरक्षण हटविण्याचा निर्णय काँग्रेस सरकारने घेतल्यानंतर, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसवर तीव्र शब्दांत हल्ला चढवला आहे. अॅड. आंबेडकर यांनी म्हटले की, भाजप = काँग्रेस. तुम्हाला अजूनही वाटते का की काँग्रेस



देशात आरक्षण वाचवेल? की ते एससी, एसटी आणि ओबीसींना न्याय देईल? काँग्रेसला प्रश्न विचारण्याऐवजी, त्यांना प्रश्न विचारा जे निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीला मतांचे विभाजन करणारा पक्ष म्हणत होते आणि काँग्रेसला मते मागत होते.

या वक्तव्यानंतर काँग्रेसच्या दलित–बहुजन हिताच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. आंबेडकरांनी तेलंगणातील ⏩ पान २ वर

## आरोपींना सहकार्य करणाऱ्या पोलिसांच्या बदल्या

### मस्साजोग प्रकरण:गृहराज्यमंत्री योगेश कदम

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपीना सहकार्य करणाऱ्या पोलिसांच्या बदल्या करा असे निर्देश गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिले. या प्रकरणात सहभाग सिद्ध झालेल्या कोणाचीही गय केली जाणार नाही असेही ते म्हणाले. श्री. कदम यांनी आज मस्साजोग येथे भेट दिली. यावेळी त्यांनी कै. संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. कै. देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख तसेच मुलगी वैभवी देशमुख यांच्याशी चर्चा केली. सरकार या प्रकरणी खंबीरपणे देशमुख कुटूंबियांच्या पाठीशी आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. देशमुख कुटूंबियांचे सांत्वन केल्यानंतर श्री. कदम यांनी आतापर्यंत झालेल्या तपासाची माहिती घेतली. बीड तरूंगात कैदेत असणारा



या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याला अतिविशिष्ट दर्जा व्हीआयपी प्रमाणे वागणूक तुरूंगातील अधिकारी देत आहेत असा आरोप सातत्याने होत आहे. याबाबत आपण मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करणार असून कराड आणि त्याच्या सहकारी अरोपीना इतर कारागृहात ⏩ पान २ वर

## जेष्ठ पत्रकार काझी हयातुल्लहा यांचे निधन

पुण्यभूमी प्रतिनिधी



गेवराई:धनगर गल्ली येथील रहिवासी तथा गेवराई तालुक्यातील जेष्ठ पत्रकार काझी हयातुल्लह वय ९० यांचे शनिवार रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास वृध्दपकाळाने निधन झाले.त्याच्यावर रविवार रोजी सकाळी शहरातील मोमीनपुरा येथील कब्रस्तान मध्ये दफनविधी करण्यात येणार आहे.त्याच्या पश्चात तीन मुल,दोन मुली, सुना,जावाई, नातवंडे असा परिवार आहे.काझी हयातुल्लहा यांनी विविध वृत्तपत्रात काम केले होतो.पत्रकार काझी अमान यांचे ते वडिल होत.

## महापुरुषांचा इतिहास प्रेरणा देतो

### अनिल डोंगरे:महामानव वाचनालयात शिवरायांचा स्मृतिदिन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:कुळवाडी भूषण रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३४५ व्या स्मृतिदिनी महामानव अभिवादन ग्रुप तर्फे महामानव सार्वजनिक वाचनालय धानोरा रोड बीड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

आयोजित अभिवादन कार्यक्रम प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हा अध्यक्ष अनिल डोंगरे अध्यक्ष म्हणून तर आयुष्यमान राणोजी उजगरे महासचिव वंचित बहुजन आघाडी धारूर चे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पदीप धुपाने पूजन करून पुष्प माला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महामानवा अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले, महामानव वाचनालयाचे उपाध्यक्ष डी.जी वानखेडे व प्राध्यापक अशोक गायकवाड, ड तेजस वडमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम राऊत यांनी तर प्रस्ताविक अर्जुन जवंजाळ यांनी केले. ⏩ पान २ वर

आंदोलन | बौद्ध भिक्खु संघासमवेत बौद्ध समाजाची मागणी

## महाबोधी बौद्ध विहार आमचे,हिंदू महंतानी ताबा सोडावा

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी बौद्ध महावीहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे.या मागणीसाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शनिवार (दि.५) रोजी एक दिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व भिक्खु पय्यातीस महाथेरो, भिक्खु धम्मशिल थेरो, भिक्खु, पय्यावर्धन,भिक्खु अचलानंद, आर्या मेत्ताजी, भिक्खु धम्मपाल तसेच आंबेडकरी प्रेमी व बौद्ध बांधव बीड यांनी केले होते.

बीड जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राष्ट्रपती यांना, दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, तथागत भगवान गौतम बुद्ध यांना बोधगया येथे ज्ञान प्राप्ती झाली. त्या ठिकाणी प्रियदर्शी चक्रवर्ती राजा सम्राट अशोक यांनी महाविहाराची






निर्मिती केली होती. तेथील जागा संपूर्ण जगाला प्रेरणास्थान असून हाच भारत देशाचा सर्वात मोठा जगामध्ये सन्मान समजला जातो. परंतु १९४९ ला बुद्धिस्ट टेम्पल कायदा करुन त्या ठिकाणी चार बौद्ध ⏩ पान २ वर

### वडवणी ते बीड लाँग मार्च

वडवणी ते बीड जिल्हाधिकारी कार्यालय इथपर्यंत महाबोधी बौद्ध विहार मुक्तीसाठी लाँगमार्च काढण्यात आला होता.लोककवी वामनदादा कलामंचकडून या लाँगमार्चचे आयोजन करण्यात आले आहे. या मार्चमध्ये बौद्ध समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

## उपमुख्यमंत्री यांच्या शब्दावर आंदोलन मागे !

### रोहन गलांडे:निलंबन मागे घेतले जात नाही तोपर्यंत मागे हटणार नाही

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जिल्हा शल्यचिकित्सक डॉ आशोक थोरात यांचे निलंबन मागे घेण्यात यावे या मागणीसाठी ५ एप्रिल रोजी अत्मदहनाच्या इशाऱ्यांचे आंदोलन रोहन गलांडे यांनी २६ एप्रिल पर्यंत स्थगित केले आहे कारण सरकार निलंबन मागे घेण्यासाठी वेळ मागु करत आहे तसेच उपमुख्यमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी २ एप्रिल रोजी सभेत बोलताना म्हटले की निलंबन मागे घेण्यात येईल त्यामुळे रोहन गलांडे पाटील यांनी ५ एप्रिल रोजीचा अत्मदहनाचे आंदोलन स्थगित करत केला आहे परंतु येणाऱ्या २६ एप्रिल



पर्यंत निलंबन मागे घेतले नाही तर २६ एप्रिल रोजी श्री संत नामदेव महाराज सभागृह चिंचोली माळी येथे अत्मदहन करणार आहे असे सरकारला कळविण्यात येते तरी २६ एप्रिल रोजी माझे काही बरे वाईट झाले तर सरकार, प्रशासन जबाबदार राहील ⏩ पान २ वर

## सरकारचा जनहितैषी निर्णय

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात कार्यरत असलेल्या सत्ताधारी महायुती सरकार विविध जनहितैषी निर्णय घेत महाराष्ट्रातील जनतेला दिलासा देण्याचे काम करत आहे. राज्यातील नागरिकांसाठी महसूल विभागाने मालमत्तांच्या दस्त नोंदणीबाबत क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. राज्यात १ मेपासून 'फेसलेस नोंदणी', 'मुद्रांक नोंदणी' आणि 'एक राज्य, एक नोंदणी' प्रणाली सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून तशी घोषणाही केलेली आहे. आता कोल्हापूरमध्ये कोणी घर घेत असेल तरी नागपुरातूनही त्यांना मालमत्तेसंदर्भातील दस्त नोंदणी करणे या निर्णयामुळे शक्य होणार आहे. आधार कार्ड आणि उत्पन्नाच्या दाखल्यावरून तुमचा चेहरा नोंदणीसाठी वापरण्याची सुविधा मिळणार आहे. या निर्णयामुळे या प्रक्रियेत होणारा भ्रष्टाचार कमी होईल, नागरिकांचा वेळ वाचेल आणि डिजिटल प्रक्रियेमुळे महसूल व्यवहार अधिक पारदर्शक होतील.

'डिजिटल इंडिया' आणि 'डिजिटल महाराष्ट्र' हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचा संकल्प आहे आणि आम्ही त्यावर काम करीत आहोत. नवीन महसूल प्रणालीमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयामुळे भविष्यात घर खरेदी-विक्री, जमीन व्यवहार आणि नोंदणी अधिक सुटसुटीत आणि सुलभ होणार आहे. घराच्या नोंदणीसाठी उपनिबंधक कार्यालयात घालावे लागणारे हेलपाटे, लागलेल्या रांगा, दलालांचे जाळे यामध्ये सर्वसामान्य माणूस पिचला जात आहे. या निर्णयामुळे या सर्व गोष्टींना आळा बसणार आहे. ही सगळी प्रक्रिया ऑनलाइन असणार आहे. महसूल खात्याने एक राज्य एक नोंदणी हे धोरण स्वीकारले आहे. यानुसार आता राज्यातील कुठूनही कुठलीही मुद्रांक नोंदणी करता येणार आहे. आधार कार्ड, इन्कमटॅक्स कार्डच्या आधारे ही नोंदणी फेसलेस राहणार आहे. राज्यात रेडी रेकनरचे दर लागू करण्यात आले आहेत. यामध्ये क्षेत्रनिहाय दर असणे गरजेचे आहे. झोपडपट्टी, चाळी, औद्योगिक, वाणिज्य, पुनर्विकास आदीबाबत वेगवगळे दर असावे. यासाठी विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत जीआयएस तंत्रज्ञानावर आधारित सर्वे करून क्षेत्रनिहाय दर तयार करण्यात येणार आहेत. मुंबई शहरामध्ये प्राधान्याने या सर्वेची सुरुवात करावी. सिटी सर्वे क्रमांकानुसार मुंबई शहरातील जीआयएस तंत्रज्ञानावर आधारित सर्वे पूर्ण करावा. याबाबत कालबद्ध कार्यक्रम आखून कारवाई पूर्ण करावी. याबाबत मुंबई शहरातील लोकप्रतिनिधींच्या सूचना घेण्यात याव्यात. रेडीरेकनरच्या दरामध्ये दुरुस्ती करायची असल्यास वर्षातून दोन वेळा दुरुस्ती करण्याचे अधिकार शासनाकडे घेण्यात यावेत, याबाबत कारवाई करावी.

मुंबई शहरातील क्षेत्रनिहाय रेडीरेकरनच्या दराबाबत धोरण ठरविण्यासाठी मुंबईतील सर्व आमदार, सर्व संबंधित शासकीय यंत्रणा प्रमुख यांच्या बैठकांचेही राज्य सरकार लवकरच आयोजन करणार आहे. या नव्या व्यवस्थेमुळे नागरिकांना राज्यातील कोणत्याही नोंदणी कार्यालयात दस्तनोंदणी करण्याचा पर्याय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांच्या वेळेची बचत होणार असून अनावश्यक खर्चही टाळला जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली एकत्रित नोंदणी योजना संपूर्ण राज्यात अमलात आणली जात आहे. ही प्रणाली डिजिटल इंडिया मोहिमेला चालना देणारी आहे. नागरिकांना दस्त नोंदणीसाठी नोंदणी कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याची गरज भासणार नाही. दस्तांची ऑनलाईन मूल्यांकन प्रणाली लागू केल्यामुळे महसुलात अपव्यय किंवा चुकीच्या नोंदींसाठी वाव राहणार नाही. या योजनेच्या अधिक सुरक्षित अंमलबजावणीसाठी दस्तावर अधिकाऱ्यांची डिजिटल स्वाक्षरी बंधनकारक असणार आहे. तसेच नागरिकांच्या ओळखीची पडताळणी आधारकार्ड आणि पॅन कार्डच्या मदतीने केली जाणार आहे. खरेदी-विक्री व्यवहाराची नोंदणी संबंधित जिल्ह्यातील विशिष्ट नोंदणी कार्यालयातच याआधी नागरिकांना करावी लागत असे. त्यामुळे नागरिकांना अनावश्यक वेळ खर्च करावा लागत होता. आता या नव्या योजनेमुळे कोणत्याही जिल्ह्यात दस्तनोंदणी करणे शक्य होणार आहे. त्यामुळे खरेदीदार आणि विक्री करणाऱ्यांचा वेळ आणि खर्चही वाचणार आहे. जमिनी आणि मालमत्तांच्या दस्तांची नोंदणी त्या त्या जिल्ह्याच्या सहनिबंधक कार्यालयातच जाऊन करावी लागते. एका व्यक्तीने जर इतर जिल्ह्यात मालमत्ता खरेदी केली, तर त्या व्यक्तीला त्या जिल्ह्यात जाऊनच दस्त नोंदणी करावी लागते. मात्र याला प्रक्रियेला खूप वेळ जातो आणि यामुळे मोठी गैरसोय होते.

सध्या या योजनेची अंमलबजावणी प्रायोगिक तत्त्वावर मुंबई शहर आणि उपनगरात सुरू करण्यात येत असून जर ही योजना यशस्वी झाली तर त्यानंतर राज्यात ती लागू करण्यात येईल. हा निर्णय महाराष्ट्रीय जनतेच्या भल्यासाठीच असून तो उपयुक्त ठरणारा आहे. व्यवहार शेतजमिनीचा असो अथवा सदनिका खरेदी विक्रीचा असो, त्या व्यवहारात पैशांची जमवाजमव करताना संबंधितांची दमछाक होते. या होणाऱ्या व्यववहारामध्ये काही रक्कम रोखीच्या स्वरूपात तर काही रक्कम धनादेशाच्या स्वरूपात द्यावी लागत असते. त्यामुळे ज्या शहरामध्ये हा खरेदी-विक्रीचा व्यवहार झाला असेल, त्या शहरामध्ये व्यवहारासंदर्भातील पैशाची ने-आण करावी लागते, प्रवासाची दगदग सहन करावी लागते. या सर्व गोष्टींना आता पूर्णपणे विराम लागणार आहे. प्रारंभी, या उपक्रमांतर्गत मुंबई शहर आणि उपनगरांतील ३२ उपनिबंधक कार्यालये परस्पर जोडली गेली आहेत. त्यामुळे खरेदीदारांना दस्तनोंदणीसाठी ठरावीक कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही. कोणत्याही संबंधित कार्यालयातून दस्तनोंदणी करणे शक्य होणार आहे. या उपक्रमातील तांत्रिक अडचणींचे निराकरण केल्यानंतर पुढील एका महिन्यात संपूर्ण राज्यात ही योजना लागू करण्याचे नियोजन आहे. मार्च महिन्यात दस्तनोंदणी मोठ्या प्रमाणावर केली जाते, कारण रेडीरेकनर दरात वाढ होण्याची शक्यता असते.

# लोणारमध्ये बनावट नोटांचे रॅकेट
## वेलडन: लोणार पोलीसांची धडाकेबाज कारवाई

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार: पोलीसांना गोपनिय बातमीदारा मार्फत खबर मिळाली कि एक व्यक्ती त्याचे कडे काही १०० व ५०० रू च्या बनावट नोटा बाळगुन त्या बाजारात चालवत आहे. अशा माहिती वरून लोणार पोलीस

स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी पंचासह लोणार येथील हिरडव चौकात सापळा रचुन सदर व्यक्तीला ताब्यात घेवुन पंचासमक्ष त्याच्या ताब्यातुन १०० रू. च्या ०७ बनावट नोटा जप्त केल्या. सदर आरोपी मोईन खान रा. लोणार याचे विरूध्द सपोनि.इंगोले यांचे लेखी रिपोर्ट वरून अप क.११४/२५ कलम १७९, १८० भान्यासं अन्वये गुन्हा दाखल केला.




ठाणेदार निमीष मेहेत्रे यांचे आदेशाने पुढील गुन्हयाच्या तपास पोउपनि धनंजय इंगळे यांचे कडे देऊन पोउपनि धनंजय इंगळे व पोस्टाफ यांनी ठाणेदार निमीष मेहेत्रे यांचे नेतृत्वात पुढील तपास करून गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हयातील इतर आरोपी मोहमंद अतिक मोहमंद लुकमान वय ४१ वर्ष, रा. नवीनगरी लोणार, शेख लुकमान शेख कालु वय ५६ वर्ष, रा.आझाद नगर लोणार, सै मुजाहिद अली सै मुमताज अली वय २३ वर्ष, रा. रोशनपुरा लोणार, अब्दुल रहीम अब्दुल रशीद वय ३५ वर्ष, रा. सुलतानपुर यांचा शोध घेवुन त्यांना अटक केली. त्यांचा पीसीआर घेवुन त्यांनी गुन्हयात वापरलेल्या १०० रू.च्या १९ बनावट नोटा व एका पार्टी कडुन दुसऱ्या पार्टीला नोटा देता वेळेसचे त्यांना मिळालेले कमिशनचे एकुन १०००० रू असे आरोपी कडुन जप्त केले. उर्वरित नोटा पोलीसांच्या भितीने आरोपीतांनी जाळुन टाकल्या. सदर गुन्हयातील इतर आरोपी सध्या फरार असुन पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. सदर बनावट नोटा छापणारा व बाजारात त्या खऱ्या म्हणुन पुरवणारा मुख्य सुत्रधार कोण आहे व इतर आरोपी कोण आहेत या दिशेने पोलीसांचा तपास सुरू असुन यामधे अजुन आरोपी वाढण्याची शक्यता आहे. सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. विश्व पानसरे, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. बाबुराव महामुनी, उपविभागीय पोलीस अधिकारी मेहकर श्री. प्रदिप पाटिल यांचे मार्गदर्शनात ठाणेदार श्री. निमीष मेहेत्रे यांचे नेतृत्वात सपोनि. गणेश इंगोले, पोउपनि धनंजय इंगळे, पोहवा खराडे, पोहवा चव्हाण, पोना जाधव, पोशि लोढे, पोशि धोंडगे, पोशि शेळके, पोशि शिंदे यांनी केली असुन पुढील तपास पोउपनि धनंजय इंगळे व पोशि शेळके हे करित आहेत.

## आष्टीत स्कुल बसला अपघात विद्यार्थी जखमी
### आ.सुरेश धस यांनी घटनास्थळी दिली भेट

आष्टी/प्रतिनिधी

शाळेला विद्यार्थी घेऊन जाणाऱ्या स्कूल बस झाडाला धडकल्याची घटना आष्टी शहराजवळ घडली. आष्टी येथील अहिल्यानगर - बीड रस्त्यावरील गणपतीजवळ लोकनेते गोपीनाथराव मुंडे चौकात बेलगाव फाटा येथे हा अपघात झाला. वटणवाडी येथून शाळेला विद्यार्थी घेऊन ही स्कूल बस आष्टीकडे येत होती. सकाळच्या सत्रातील शाळा असल्याने चालक मुलाला घेऊन चालला होता.

अचानक समोर आलेल्या स्विफ्ट कारला वाचविण्याच्या प्रयत्नात चालक झाडावर जाऊन आदळला. हा अपघात इतका भयानक होता की यामुळे विद्यार्थी घाबरले तर अचानक झालेल्या या घटनेमुळे विद्यार्थ्यांना धक्का बसला.यामधे काही विद्यार्थी किरकोळ जखमी झालेले आहेत. वाहन चालकाला चांगलाच मार लागलेला आहे.जखमींवर आष्टी येथील ग्रामीण रुग्णालय उपचार करून घरी पाठविण्यात आले असून सदर घटनेची माहिती मिळताच आ.सुरेश धस यांनी ग्रामीण रुग्णालयात धाव घेत जखमी विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला.महामार्गावरील असणाऱ्या अनधिकृत बॅनर आणि काही दुकानाच्या अतिक्रमण करून लावलेल्या जाहिरातींच्या फलकाचा वाहन चालकांना नेहमीच अडथळा होत असल्याचे प्रत्यक्षदर्शनी असलेल्यांनी सांगितल्यावर आ.सुरेश धस यांनी तात्काळ स्थानिक ग्रामपंचायत,नगरपंचायत व पोलिस प्रशासनाला सूचना देत हे फलक तातडीने काढण्यात यावेत असे सांगितले आहे.



## वेद शैक्षणिक संकुलात अभिवादन
### कार्यक्रम:छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिदिन



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या प्रेरणेने भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य सतिश मातने यांच्या मार्गदर्शनाखाली वेद शैक्षणिक संकुल अंतर्गत भैरवनाथ अध्यापक विद्यालय व भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दि.३ एप्रिल २०२५ वार गुरुवार रोजी कुळवाडी भूषण, बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य सतीश मातने यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

या प्रसंगी भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सुरज भांडे,प्रा. श्रीकांत पवार,प्रा.मोहिनी शिंदे,सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अविनाश घोडके,निदेशक अविनाश म्हेत्रे,निदेशक राजकुमार शिंदे,निदेशक अर्जुन मंडाळे,आदित्य गायकवाड, निदेशिका कोमल मगर,दिक्षा गायकवाड आदी संस्थेचे शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## नाथापूर येथे हरिनाम सप्ताह

पुण्यभूमी प्रतिनिधी

नाथापूर:बीड तालुक्यातील नाथापूर या गावी अखंड हरिनाम सप्ताह आज पासून सुरू होत असून सप्ताहाचे चौदावे वर्ष आहे श्री ह भ प आत्माराम शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री ह भ प नवनाथ महाराज यांच्या आशीर्वादाने आज दिनांक ५ एप्रिल शनिवार या दिवशीपासून सप्ताह सुरुवात होत आहे पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा ह भ प छायाताई महाराज जोगदंड संभाजीनगर तर सहा एप्रिल रविवार या दिवशी श्री ह भ प भागवताचार्य कल्याण महाराज देवडकर यांची कीर्तन होईल तर दिनांक सात एप्रिल सोमवार या दिवशी श्री ह भ प दिगंबर महाराज नकाते तर दिनांक ८ एप्रिल वार मंगळवार या दिवशी श्री ह भ प वारकरी भूषण अर्जुन महाराज मोठे पळशीकर दिनांक ९ एप्रिल बुधवार या दिवशी श्री ह भ प बालाजी महाराज मोहिते यांचे तसेच १० एप्रिल रोजी गुरुवारी ह भ प रामकृष्ण रंधवे बापू पाटोदा यांची होईल दिनांक ११ एप्रिल रविवार या दिवशी श्री ह भ प बाळा साहेब महाराज रंजाळे यांची कीर्तन होईल व शेवटी काल्याची कीर्तन श्री ह भ प नाना महाराज कदम संस्थान बंकट स्वामी ने कनूर यांची अकरा वाजता सुरू होईल दररोज भागवत कथा श्री अंगद महाराज सातपुते हे बारा ते चार करतील दररोज काकडा भजन ज्ञानेश्वरी पारायण गाथा भजन राम कथा होईल असे समस्त गावकरी मंडळी कळवत असून भाविकांनी भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा .

## पान एक वरून

**महाबोधी महाविहार मुक्तीसाठी**

होते.ही स्वाक्षरी मोहीम ३ एप्रिल २०२५ रोजी सुरू झाली असून, १४ एप्रिल २०२५ पर्यंत चालणार आहे. बोधगया महाविहार कायदा १९४९ रद्द करावा आणि बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय बौद्धांना ताब्यात द्यावे. यासाठी स्वाक्षरी मोहीम सुरू आहे.

**काँग्रेसचा खरा चेहरा**

घटनाक्रमाबरोबरच कर्नाटकातील काँग्रेस सरकारवरही टीका केली. त्यांनी सांगितले की, २०२३-२०२५ या कालावधीत काँग्रेस सरकारने अनुसूचित जाती-जमातींच्या कल्याणकारी योजनांसाठी राखीव असलेला २५,००० कोटींपेक्षा अधिक निधी वळवून इतरत्र वापरला आहे.हा आहे काँग्रेसचा खरा चेहरा, असं म्हणत ड. आंबेडकर यांनी काँग्रेस आणि भाजपमध्ये काहीच फरक नसल्याचं स्पष्टपणे सांगितलं आहे.वंचित बहुजन आघाडीने सुरुवातीपासूनच सामाजिक न्याय, घटनेतील हक्क आणि आरक्षण यासाठी लढा दिला आहे. अशा निर्णयांनी काँग्रेसच्या धर्मनिरपेक्ष आणि बहुजन हितैषी चेहऱ्यावरचा मुखवटा गळून पडल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

**आरोपींना सहकार्य करणाऱ्या**

हलविण्याबाबत कार्यवाही संदर्भात बोलेन असे त्यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना सांगितले. उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या सांगण्यावरून मी आलो आहे. या अतिशय निर्गुण हत्याप्रकरणी कोणालाही सोडले जाणार नाही व आरोपीला फाशीच होईल या पद्धतीने आपण या प्रकरणाकडे पाहत आहोत असेही श्री कदम यावेळी म्हणाले.

**महापुरुषांचा इतिहास**

आयु.अनिल डोंगरे यांनी कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातून सुराज्य कसे निर्माण केले व त्यांच्या राज्यकारभाराची नीती तसेच राज्यकारभाराची, शेतकरी,स्त्री व जमीन सुधारण्या करिता व जलनीती करता अमल बजावणी व सर्व समावेशक अठरापगड मावळ्यांना एकत्रित करून राज्यकारभार कसा केला याबद्दल सविस्तर माहिती दिली. महाराजांची राजनीती संपूर्ण जगात आज कशी मार्गदर्शक आहे याबद्दल अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन करून त्यांच्या जीवनकार्यातून प्रत्येकाला जीवन जगण्याकरता प्रेरणा मिळते हे आवर्जून स्पष्टपणे सांगितले. या कार्यक्रमास आर्वीचे माजी सरपंच लक्ष्मण जोगदंड,अविनाश डोळस, सुधाकर विद्यागर , बि.डी तांगडे,प्रशांत वासनिक व वाचनालयाचे बहुसंख्य सदस्य उपस्थित होते.

**उपमुख्यमंत्री यांच्या शब्दावर**

असे निवेदन रात्री १२ वाजता केज तहसीलदार, पोलीस प्रशासनाला देण्यात आले आहे असे निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी काल रात्री १२ वाजता पोलीस प्रशासन चिंचोली माळी येथे रोहन गलांडे पाटील यांच्या घरी आले असता त्यांनी पोलिस प्रशासनाला व केज तहसीलदार यांना निवेद्वारे म्हटले आहे तरी डॉ आशोक थोरात यांचे निलंबन २६ एप्रिल पर्यंत स्थगित केले आहे परंतु निलंबन मागे घेतले जात नाही तोपर्यंत मागे हटणार नाही असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

**महाबोधी बौद्ध विहार आमचे,हिंदू**

भिक्खु, चार ब्राह्मण व एक त्या ठिकाणचे जिल्हाधिकारी अशी कमिटीची निर्मिती करण्यात आली.त्यामुळे बौद्ध समाजावर हा एकप्रकारे अन्याय आहे. वास्तविक पाहता बौद्ध विहारामध्ये बौद्ध शिवाय इतर कोणालाही समितीवर सदस्य घेण्याचे काहीही कारण नाही. परंतु जगभरातून महाबोध्दी बुद्ध विहार येथे कोठ्यावदी रुपये दान मिळत असल्याने तो पैसा लुबाडण्यासाठी सरकारने अशा पद्धतीची कमिटी स्थापन केलेली आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम १३ नुसार १९५० च्या आधीचे सर्व कायदे रद्द करण्यात आलेले आहेत. तरी देखील बौद्ध टेम्पल कायद्यात शासन कोणताही बदल करत नाही. हा बौद्ध समाजावर अन्याय आहे. तरी महामहिम राष्ट्रपतीजी यांना निवेदन करण्यात येते की, बुद्धिस्ट टेम्पल ॲक्ट रद्द करुन महाबोधी महाविहार बुद्ध गया हे बौद्धांच्या ताब्यात देण्या यावे. अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी बौद्ध समाजाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पान सहा वरून

**तांत्रिक विश्लेषणातून मोबाईलचा**

१२) एक ओपो कंपनीचा F27 Pro मोबाईल किं. अं.१०,०००/- रू १३ ) एक सॅमसंग कंपनीचा छेंश १० मोबाईल किं.अं.१,३८,०००/- रू असे एकुण १३ मोबाईल एकुण किंमत ३,२५,०००/- रूपयेचे गहाळ मोबाईलचा शोध घेवून सदरचे मोबाईल मुळ मालक तक्रारदार यांना परत केलेले आहेत. गहाळ मोबाईलचा शोध घेवून त्यांना परत केल्याने पोलीसांच्या कामगिरीवर संमाधान व्यक्त केले असून पोलीसांचे आभार मानले आहेत.त्यामुळे पोलीसांची जनमानसात चांगली प्रतिमा निर्माण झाली आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक नवनीत काँवत साहेब,, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले साहेब यांचे मार्गदर्शनाखाली तसेच संभाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक धनजंय ढोणे, पोउपनि अनिल शिंदे, पोअं/ १४६ खाडे, टेक्नीकल ॲनालिलिस सेल बीड येथील पोअं/विक्की सुरवसे यांनी केलेली आहे.

**पंकजाताई आ.नमिताला**

कुठे तरी आवर घातला पाहिजे व हे काम मंत्री पंकजाताई मुंडे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करु शकतात असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेने**

संस्थापक व सचिव आदरणीय अविनाश टिकले गुरुजी,मुख्याध्यापक,सच्चीदानंद लोमटे सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांनी हार्दिक अभिनंदन केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.पुढे पालक प्रतिनिधी म्हणून बोलताना सचिन लोमटे यांनी शाळेची गुणवत्ता व शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले.याप्रसंगी सर्व शिक्षक, विद्यार्थी,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**टंचाई गस्त गावात टँकर**

खाली निवेदन देऊन करण्यात आली. या प्रसंगी रिपाइं दिव्यांग आघाडी जिल्हाध्यक्ष शाहू डोळस, युवा रिपाइं अध्यक्ष बीड सुभाष तांगडे, राहुल कोरडे, बाबासाहेब जाधव, नागेश शिंदे, बाबुराव भालेराव, भाऊसाहेब दळवी, सतिश शिनगारे, प्रकाश ससाणे, श्रीरंग वाघमारे, अनंत विद्यागर, गणेश प्रधान, सलीम बेग, भानुदास मुजमले, किसन डोळस, अशोक मस्के, बाबुराव आठवले, बारीक राव वाघमारे, राम कोकणे, रामराजे कुरगडे, प्रभु माने, पांडुरंग मोटे, बाळु पवार आदी उपस्थित होते.

**केजमध्ये जयभिम महोत्सवाचे**

महाराष्ट्राचे सुप्रसिध्द व्याख्याते समाज भुषण युवा मा. डॉ. वसंत हंकारेसर यांचा समाज प्रबोधनात्मक व्याख्यानाचा कार्यक्रम, दि. १२ एप्रिल शनिवारी संध्याकाळी इंडियन आयडॉल मराठीचे फायॉलिस्ट प्रतिक सोळसे यांचा भिम गीतांचा कार्यक्रम, दि.१३ एप्रिल रविवारी संध्याकाळी महाराष्ट्रात सुप्रसिध्द गाजले गीत मिशीला मारा पिळा या गीताच्या सुप्रसिध्द गायिका गुणगुण रणयेवले यांचा भिम गीतांचा कार्यक्रम होईल. तर सोमवार दि. १४ एप्रिल रोजी सकाळी बुध्द वंदना व पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहन आणि बक्षिस वितरणासह प्रमुख मान्यवरांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन तर संध्याकाळी सात वाजता आकर्षक देखावा व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शहरातून भव्य मिरवणुक काढली जाणार आहे. तरी या सर्व होणा-या कार्यक्रमाला मोठ्या संख्येंने उपस्थित रहावे अशी विनंती भिमजंयती उत्सव समीतीचे अध्यक्ष निखील समुद्रे व सचिव निखील गायकवाड आणि एल.एफ.सी. ग्रुपच्या वतीने करण्यात आली आहे.

**ग्रामीण भागातही खेळाडू**

आवदुत खाडप ,अंगद जाणकर, रेवणकर सर, नानासाहेब खाडप ,यांच्यासह अदि. उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना करताना यशवंतराव पाटील म्हणाले , ग्रामीण भागात आयपीएलच्या धर्तीवर क्रिकेट स्पर्धा होत आहेत. तेव्हा खेळाडूनी उत्कृष्ट कामगिरी करून गाव , तालुका व जिल्हयात नावलौकिक मिळवावे. खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा यशस्वी कराव्यात . कार्यक्रमाचे प्रस्ताविक आवदुत खाडप यांनी केले. सुत्रसंचलन अरुण धायगुडे यांनी तर आभार महेश खाडप यांनी मानले. या उद्घाटन समारंभास रेणापूर तालुक्यातील कॉग्रेस पक्षाचे पदाधिकारी , कार्यकर्ते व खेळाडू मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नवनाथ(राज) खाडप, पप्पू खाडप , सुरज खाडप , नारायन धायगुडे , गणेश खाडप , तानाजी खाडप , पांडुरंग कलूरे , अमोल कांबळे , खंडू शिंदे ,विशाल पाटील ,ओम खाडप,अक्षय खाडप,सादिक सय्यद ,नागेश एकुरके यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले.

**गेवराईत श्रीराम जन्मोत्सवाचे**

मिरवणुकीमध्ये भव्य ढोल पथक असणार असून या मिरवणुकीमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सतीश दादा दाभाडे यांनी केले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# महसूल विभागाचा जनहितैषी क्रांतिकारी निर्णय

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात कार्यरत असलेल्या सत्ताधारी महायुती सरकार विविध जनहितैषी निर्णय घेत महाराष्ट्रातील जनतेला दिलासा देण्याचे काम करत आहे. राज्यातील नागरिकांसाठी महसूल विभागाने मालमत्तांच्या दस्त नोंदणीबाबत क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. राज्यात १ मेपासून 'फेसलेस नोंदणी', 'मुद्रांक नोंदणी' आणि 'एक राज्य, एक नोंदणी' प्रणाली सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून तशी घोषणाही केलेली आहे. आता कोल्हापूरमध्ये कोणी घर घेत असेल तरी नागपुरातूनही त्यांना मालमत्तेसंदर्भातील दस्त नोंदणी करणे या निर्णयामुळे शक्य होणार आहे. आधार कार्ड आणि उत्पन्नाच्या दाखल्यावरून तुमचा चेहरा नोंदणीसाठी वापरण्याची सुविधा मिळणार आहे. या निर्णयामुळे या प्रक्रियेत होणारा भ्रष्टाचार कमी होईल, नागरिकांचा वेळ वाचेल आणि डिजिटल प्रक्रियेमुळे महसूल व्यवहार अधिक पारदर्शक होतील.

'डिजिटल इंडिया' आणि 'डिजिटल महाराष्ट्र' हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचा संकल्प आहे आणि आम्ही त्यावर काम करीत आहोत. नवीन महसूल प्रणालीमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयामुळे भविष्यात घर खरेदी-विक्री, जमीन व्यवहार आणि नोंदणी अधिक सुटसुटीत आणि सुलभ होणार आहे. घराच्या नोंदणीसाठी उपनिबंधक कार्यालयात घालावे लागणारे हेलपाटे, लागलेल्या रांगा, दलालांचे जाळे यामध्ये सर्वसामान्य माणूस पिचला जात आहे. या निर्णयामुळे या सर्व गोष्टींना आळा बसणार आहे. ही सगळी प्रक्रिया ऑनलाइन असणार आहे. महसूल खात्याने एक राज्य एक नोंदणी हे धोरण स्वीकारले आहे. यानुसार आता राज्यातील कुठूनही कुठलीही मुद्रांक नोंदणी करता येणार आहे. आधार कार्ड, इन्कमटॅक्स कार्डच्या आधारे ही नोंदणी फेसलेस राहणार आहे. राज्यात रेडी रेकनरचे दर लागू करण्यात आले आहेत. यामध्ये क्षेत्रनिहाय दर असणे गरजेचे आहे. झोपडपट्टी, चाळी, औद्योगिक, वाणिज्य, पुनर्विकास आदीबाबत वेगवगळे दर असावे. यासाठी विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत जीआयएस तंत्रज्ञानावर आधारित सर्वे करून क्षेत्रनिहाय दर तयार करण्यात येणार आहेत. मुंबई शहरामध्ये प्राधान्याने या सर्वेची सुरुवात करावी. सिटी सर्वे क्रमांकानुसार मुंबई शहरातील जीआयएस तंत्रज्ञानावर आधारित सर्वे पूर्ण करावा. याबाबत कालबद्ध कार्यक्रम आखून कारवाई पूर्ण करावी. याबाबत मुंबई शहरातील लोकप्रतिनिधींच्या सूचना घेण्यात याव्यात. रेडीरेकनरच्या दरामध्ये दुरुस्ती करायची असल्यास वर्षातून दोन वेळा दुरुस्ती करण्याचे अधिकार शासनाकडे घेण्यात यावेत, याबाबत कारवाई करावी.

मुंबई शहरातील क्षेत्रनिहाय रेडीरेकरनच्या दराबाबत धोरण ठरविण्यासाठी मुंबईतील सर्व आमदार, सर्व संबंधित शासकीय यंत्रणा प्रमुख यांच्या बैठकांचेही राज्य सरकार लवकरच आयोजन करणार आहे. या नव्या व्यवस्थेमुळे नागरिकांना राज्यातील कोणत्याही नोंदणी कार्यालयात दस्तनोंदणी करण्याचा पर्याय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांच्या वेळेची बचत होणार असून अनावश्यक खर्चही टाळला जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली एकत्रित नोंदणी योजना संपूर्ण राज्यात अमलात आणली जात आहे. ही प्रणाली डिजिटल इंडिया मोहिमेला चालना देणारी आहे. नागरिकांना दस्त नोंदणीसाठी नोंदणी कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याची गरज भासणार नाही. दस्तांची ऑनलाईन मूल्यांकन प्रणाली लागू केल्यामुळे महसुलात अपव्यय किंवा चुकीच्या नोंदींसाठी वाव राहणार नाही. या योजनेच्या अधिक सुरक्षित अंमलबजावणीसाठी दस्तावर अधिकाऱ्यांची डिजिटल स्वाक्षरी बंधनकारक असणार आहे. तसेच नागरिकांच्या ओळखीची पडताळणी आधारकार्ड आणि पॅन कार्डच्या मदतीने केली जाणार आहे. खरेदी-विक्री व्यवहाराची नोंदणी संबंधित जिल्ह्यातील विशिष्ट नोंदणी कार्यालयातच याआधी नागरिकांना करावी लागत असे. त्यामुळे नागरिकांना अनावश्यक वेळ खर्च करावा लागत होता. आता या नव्या योजनेमुळे कोणत्याही जिल्ह्यात दस्तनोंदणी करणे शक्य होणार आहे. त्यामुळे खरेदीदार आणि विक्री करणाऱ्यांचा वेळ आणि खर्चही वाचणार आहे. जमिनी आणि मालमत्तांच्या दस्तांची नोंदणी त्या त्या जिल्ह्याच्या सहनिबंधक कार्यालयातच जाऊन करावी लागते. एका व्यक्तीने जर इतर जिल्ह्यात मालमत्ता खरेदी केली, तर त्या व्यक्तीला त्या जिल्ह्यात जाऊनच दस्त नोंदणी करावी लागते. मात्र याला प्रक्रियेला खूप वेळ जातो आणि यामुळे मोठी गैरसोय होते.

सध्या या योजनेची अंमलबजावणी प्रायोगिक तत्त्वावर मुंबई शहर आणि उपनगरात सुरू करण्यात येत असून जर ही योजना यशस्वी झाली तर त्यानंतर राज्यात ती लागू करण्यात येईल. हा निर्णय महाराष्ट्रीय जनतेच्या भल्यासाठीच असून तो उपयुक्त ठरणारा आहे. व्यवहार शेतजमिनीचा असो अथवा सदनिका खरेदी विक्रीचा असो, त्या व्यवहारात पैशांची जमवाजमव करताना संबंधितांची दमछाक होते. या होणाऱ्या व्यववहारामध्ये काही रक्कम रोखीच्या स्वरूपात तर काही रक्कम धनादेशाच्या स्वरूपात द्यावी लागत असते. त्यामुळे ज्या शहरामध्ये हा खरेदी-विक्रीचा व्यवहार झाला असेल, त्या शहरामध्ये व्यवहारासंदर्भातील पैशाची ने-आण करावी लागते, प्रवासाची दगदग सहन करावी लागते. या सर्व गोष्टींना आता पूर्णपणे विराम लागणार आहे. प्रारंभी, या उपक्रमांतर्गत मुंबई शहर आणि उपनगरांतील ३२ उपनिबंधक कार्यालये परस्पर जोडली गेली आहेत. त्यामुळे खरेदीदारांना दस्तनोंदणीसाठी ठरावीक कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही. कोणत्याही संबंधित कार्यालयातून दस्तनोंदणी करणे शक्य होणार आहे. या उपक्रमातील तांत्रिक अडचणींचे निराकरण केल्यानंतर पुढील एका महिन्यात संपूर्ण राज्यात ही योजना लागू करण्याचे नियोजन आहे. मार्च महिन्यात दस्तनोंदणी मोठ्या प्रमाणावर केली जाते, कारण रेडीरेकनर दरात वाढ होण्याची शक्यता असते. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या शेवटच्या टप्प्यात राज्यभर हा उपक्रम लागू करण्याऐवजी, मुंबईतील प्रयोग यशस्वी झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाचे महाराष्ट्रीय जनतेकडून उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले असून यामुळे पैशांची व वेळेची बचत होईल. व्यवहारासाठी करावी लागणारी धावपळ, शारीरिक दगदग संपुष्टात येईल आणि आपल्या निवासी तसेच सोयीच्या परिसरातच नोंदणी व्यवहार पूर्ण करणे शक्य होणार आहे.

# ...म्हणून हवा विशेष जनसुरक्षा कायदा!



अर्बन नक्षल संकल्पनेविषयी असलेले गैरसमज दूर करण्यासाठी माओवादी साहित्याचा अभ्यास गरजेचा आहे. यामधून याबद्दलचे सर्व गैरसमज आणि मनातील शंका सहज दूर होतील आणि नव्या जनसुरक्षा कायद्याचे महत्त्वही अधोरेखित होईल. यात विरोधी विचारांचा आवाज दडपण्याचा हेतू नाही, तर राष्ट्रविरोधी शक्तींच्या देशविघातक कृतींपासून देशाला वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे.



**प्रवीण दीक्षित**
निवृत्त पोलीस महासंचालक

वाढता नक्षलवाद आणि त्याचा सामना करण्यात झुंजणारे सरकार हे एक परिचित चित्र आहे. चकमकीत नक्षलींच्या होणाऱ्या हत्या वा त्यांचे आत्मसमर्पण आदी विषयही सातत्याने कानावर पडणारे आहेत. मात्र, अलीकडे अर्बन नक्षलींचा मुद्दाही ऐरणीवर आला आहे. शहरी भागातील तरुण-तरुणींना आपल्या जाळ्यात ओढून, समाजात असंतोष उत्पन्न करण्याच्या कामी लावणे आणि याद्वारे आपली संघटना मजबूत करण्याचा विचार वाळवीसारखा पसरत असून यामुळे समाज पोखरला जाण्याची भीती अवाजवी म्हणता येणार नाही. त्यामुळेच या विषयाच्या मुळाशी जाऊन विचार करणे गरजेचे ठरते. पूर्वपीठिका बघता, १२ सप्टेंबर २००४ रोजी माओईस्ट कम्युनिस्ट सेंटर आणि सीपीआय या दोन संघटनांचे विलीनीकरण झाले आणि कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचा जन्म झाला. आज 'अर्बन नक्षल' संकल्पनेविषयी वेगवेगळे मतप्रवाह आहेत. मात्र यातील गैरसमज दूर करण्यासाठी प्रथम माओवादी साहित्याचा अभ्यास करावा लागेल. याद्वारेच सर्व गैरसमज आणि मनातील शंका दूर होतील आणि या आनुषंगाने येणाऱ्या जनसुरक्षा कायद्याचे महत्त्वही अधोरेखित होईल. यात विरोधी विचारांचा आवाज दडपण्याचा हेतू नाही तर राष्ट्रविरोधी शक्तींच्या देशविघातक कृतींपासून देशाला वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे 'स्ट्रॅटेजी ॲण्ड टॅक्टिक्स ऑफ इंडियन रिव्हॉल्युशन' हे पुस्तक वेगवेगळ्या चकमकींदरम्यान जप्त करण्यात आले. मात्र ते आजही डिजिटल माध्यमातून उपलब्ध करून दिले जाते. या पुस्तकाचा भाग-दोन माओवाद्यांच्या कार्यनीतीवर आधारित आहे. त्यातील प्रकरण क्रमांक १३ माओवाद्यांची शहरी भागातील कार्याची दिशा स्पष्ट करणारे आहे. यात माओवादी संघटनांनी तीन अस्त्रांना जादुई अस्त्र संबोधले आहे. ती म्हणजे पार्टी, संयुक्त मोर्चा आणि सैन्य. यातील संयुक्त मोर्चा हे सर्वाधिक प्रभावी आणि क्रांतिकारी अस्त्र म्हणून वापरले जाते. यामागील मूळ उद्देश म्हणजे देशातील प्रस्थापित संवैधानिक व्यवस्थांविरुद्ध जनसमुदायाचा सहभाग. तो हेतू साध्य झाल्यानंतरच सशस्त्र क्रांतीचा मार्ग पत्करला जातो. यातील हा संयुक्त मोर्चा म्हणजेच सोप्या भाषेत अर्बन नक्षल किंवा शहरी माओवादी आहे, हे लक्षात येते. यात प्रामुख्याने विद्यार्थी, बेरोजगार तरुण, परिपूर्ण विकास साधू न शकलेले लोक, महिला, जंगलात राहणारे नागरिक, भूमिहीन आणि गरीब शेतकरी अशा सामाजिक घटकांवर लक्ष केंद्रित केले जाते. यासाठी विषय निवडून कृती समिती, संप समिती, संघर्ष समिती, आंदोलनांची आखणी आदी केली जाते किंवा काही वाजवी आंदोलनांमध्ये शिरकाव वा घुसखोरी केली जाते. तिथे लोकांना आपल्या समस्या सशस्त्र क्रांतीशिवाय सुटूच शकत नाहीत, असे धडे दिले जातात आणि त्यातून गृहयुद्धासारखी परिस्थिती निर्माण केली जाते.

एवढेच नाही तर, सैन्य आणि अर्धसैन्य दलात घुसखोरी करुन लोकांना घातपाती कार्यासाठी प्रवृत्त केले जाते. नक्षली चळवळीसाठी शस्त्र, दारूगोळा, औषधे, तांत्रिक मदत, दळणवळण यंत्रणा, इलेक्ट्रॉनिक साहित्य, प्रचार-प्रसार, नवीन नेतृत्वाची उभारणी आणि नवीन भरती इत्यादी कामे शहरी नक्षलवादाच्या माध्यमातून केली जातात. उदाहरण सांगायचे झाले तर मिलिंद तेलतुंबडे हा यवतमाळ जिल्ह्यात वणी भागातला एक तरुण युनियन नेता होता. तो वेस्टर्न कोलफिल्डसमध्ये कार्यरत होता. नक्षलींच्या सदस्यांनी त्याला बारपूर परिसरात माओवादी विचारसरणीमध्ये अंतर्भूत केले. १९९८ मध्ये तो भूमिगत झाला आणि २००५ मध्ये सदस्य झाला. त्याने विदर्भातील तरुणांना मोठ्या प्रमाणात जाळ्यात ओढले. सुदर्शन रामटेके हा सार्वजनिक बांधकाम विभागात काम करणारा एका कर्मचाऱ्याचा मुलगा. तो माओवादी चळवळीत सामील झाला. प्रारंभी त्याने केंद्रीय समितीसाठी स्टेनो म्हणून काम केले. सुदैवाने चळवळीसंबंधीचा दृष्टिकोन स्पष्ट झाला आणि त्याने आत्मसमर्पण केले. विदर्भात राजुऱ्यात शिवाजी महाविद्यालय आहे. तेथे 'देशभक्ती युवा मंच'च्या माध्यमातून राजा ठाकूर नावाचा युवक माओवादाशी जोडला गेला. नंतर तो गडचिरोलीतील एका चकमकीत मारला गेला. संतोष शेलार, प्रशांत कांबळे अशी या संदर्भातील किती तरी उदाहरणे आहेत.

पुण्यातील झोपडपट्टी परिसरातही सांस्कृतिक आघाडीच्या नावाने असेच जाळे टाकण्यात आले. ते तरुणांना जाळ्यात ओढायचे आणि भीमाशंकरच्या जंगलात प्रशिक्षणासाठी घेऊन जायचे. मुळात हे लक्षात घेतले पाहिजे की माओवाद राज्यघटना नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे. माओवाद्यांना बहुपक्षीय लोकशाही, निवडणुका, विचारस्वातंत्र्य, प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य, न्यायव्यवस्था मान्य नाही. सर्व फुटिर शक्ती एकत्र आणून देशाच्या प्रगतीला बाधा आणणे, समाज कायम अशांत ठेवणे हे यातून साध्य केले जाते. माओवादी फ्रंटल संघटनेची कार्यपद्धती वैविध्यपूर्ण आणि गुंतागुंतीची आहे. माओवादी जनसामान्यांमध्ये संवैधानिक यंत्रणा आणि एकूणच लोकशाही प्रक्रियेविरुद्ध रोष निर्माण करतात. मात्र त्यांचे असे गुन्हे 'यूएपीए' कायद्याच्या कक्षेत येत नाहीत. विविध न्यायालयांनीही अशा घटनांच्या बाबतीत 'यूएपीए'अंतर्गत मर्यादांवर बोट ठेवले आहे. त्यामुळेच अशा प्रकारच्या कारवायांसाठी 'महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा' हा स्वतंत्र कायदा आणणे ही राज्याची गरज आहे. त्यातून कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती खऱ्या अर्थाने हाताळण्यास मदत होणार आहे. अलीकडेच मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत याबाबत निवेदन केले. त्यानुसार हा कायदा माओवादी फ्रंटल संघटनांच्या कारवायांना पायबंद घालण्यासाठीच आहे. या कायद्यातील बेकायदेशीर कृत्याच्या व्याख्येत एखाद्या व्यक्तीने एखादी कृती करुन, बोललेल्या किंवा लिखित वा चिन्हाद्वारे केलेल्या कृतीचाही समावेश आहे.

हा कायदा भारतीय संविधानाच्या कलम १९ च्या चौकटीत बसणारा आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्य अमर्याद असलेच पाहिजे, पण सार्वजनिक सुरक्षा, सुव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आणणाऱ्या कृतीला अभिव्यक्तीस्वातंत्र्य म्हणता येणार नाही. प्रामुख्याने निवडणुका, न्यायालय, विधिमंडळ अशा स्तंभांना बदनाम करणे आणि त्यातून लोकशाहीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे, ही नक्षलवादाची कार्यपद्धती आहे. माओवादाचा प्रसार करणाऱ्या सर्वाधिक ६४ मुख्य संघटना महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रात वेगाने होणारे शहरीकरण आणि जंगलांमधील कारवायांमध्ये आलेले मोठे अपयश यामुळे आता शहरांमधून नक्षलवादाचा मोठा प्रसार होत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये नक्षल्यांकडून मिळालेले साहित्य पुढची लढाई शहरी युद्ध आणि शहरांमध्ये माओवादी संघटनांचा विस्तार याचा स्पष्ट संकेत देते. माओवाद्यांच्या राष्ट्रीय स्तरावरील कार्यरत केंद्रीय कार्यकारिणीतही हे निर्णय झाले आहेत. अलीकडच्या काळात आंध्र आणि तेलंगणा राज्यात जंगलातील कारवायांमध्ये घट झाली. त्या राज्यांनी किमान १२ ते १४ फ्रंटल संघटनांवर बंदी टाकली. कारण तिथेही शहरी नक्षलवाद मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तिसरे छत्तीसगड राज्य यात जोडले तर किमान ४४८ संघटनांवर बंदी घातली गेल्याचे दिसून येते.

प्रामुख्याने सांस्कृतिक आघाडी, विद्यार्थी आघाडी, नागरिक हक्क समिती, वकील संघटना अशा नावाने संघटना काढून माओवादाच्या प्रसाराला हातभार लावला जातो. कारवाई झाली की, या संघटना स्वतःचा बचाव करताना सामाजिक कार्यकर्ते, मानवाधिकार कार्यकर्त्यांवर कारवाई झाली, असा अपप्रचार करतात. वस्तुतः ते बंदी असणाऱ्या सीपीआय माओवादी संघटनेचे सदस्य असतात. प्रदीर्घ युद्ध जिंकणे आणि २०४७ मध्ये लाल किल्ल्यवर सीपीआय माओवादाचा झेंडा फडकावणे हे त्यांचे प्रमुख लक्ष्य आहे. केवळ अशाच संघटनांवर चाप लावण्यासाठी हा नवा कायदा आहे. कायदा आणि सुव्यवस्था हाताळताना आधार न लाभणाऱ्या तरतुदींचा समावेश या कायद्यामध्ये आहे. एखाद्या संघटनेवर बंदी घालायची तरतूद या कायद्यात आहे. न्यायालय हे 'सागार मंडळ' नियुक्त करते. त्यामुळे सरकार या कायद्याचा दुरुपयोग करू शकत नाही. एखाद्या संघटनेवर बंदी घातल्यानंतर गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची परवानगी अनिवार्य आहे. आरोपपत्र दाखल करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्याची परवानगी आवश्यक आहे. यामुळे कनिष्ठ अधिकारी किंवा राजकीय दबावाचे आरोप नगण्य ठरतात. महाराष्ट्राने ४० वर्षे माओवादाशी जंगलात लढा दिला. पण शहरी भागात ५० वर्षांपासून कार्यरत माओवादी संघटनांवर कोणतीही कार्यवाही केली नाही. अलीकडच्या काळात शहरी भागात नक्षलींचे जाळे मोठ्या प्रमाणात वाढल्याने त्यावर वेळीच कारवाई न केल्यास राज्याच्या सामाजिक व्यवस्थेसमोर गंभीर संकट निर्माण होऊ शकते. संविधान आणि लोकशाही न मानणाऱ्या माओवादी फ्रंटल संघटनांवर कारवाई हाच महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायद्याचा मुख्य गाभा आहे.

# रखडलेली कामे पूर्ण करा...



महाराष्ट्र राज्यातील गावांच्या विकासासाठी अनेक कामे सुरू केली जातात. मात्र पुरेशा अनुदानाअभावी अनेक ठिकाणी कामे अपूर्ण आहेत. ती पूर्ण करून घेतली पाहिजेत. म्हणजे खऱ्या अर्थाने गावांचा विकास होईल. गावांच्या विकासाभिमुख अनेक शासकीय योजना आहेत; परंतु गावातील गटबाजीमुळे अनेक योजना गावात अपुऱ्या अवस्थेत असताना दिसून येत आहेत. तेव्हा गावांच्या विकासासाठी गटतट बाजूला सारून एकजुटीने काम केले पाहिजे.



**रवींद्र तांबे**

आज गावातील स्मशानभूमीत जायला डांबरी रस्ता आहे आणि गावातील वाड्यात जायला पायवाट, मग सांगा गावाचा विकास होणार कसा. आजही बऱ्याच गावात आरोग्य केंद्र सुरू केली आहेत. मात्र पुरेसा स्टाफ नाही. डॉक्टरचा तर पत्ताच नाही. माझ्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात आजारी पडल्यास स्थानिक डॉक्टर ॲडमिट करतात नंतर आठवड्याने रुग्णाच्या नातेवाइकाला सांगतात पणजी, कोल्हापूर किंवा मुंबईला पेशंटला घेऊन जा. ही आजची परिस्थिती आहे. म्हणजे अजूनही आपण आरोग्याच्या बाबतीत फारशी सुधारणा करू शकलो नाही. माझ्याही वडिलांना शेवटी पणजीला घेऊन जावे लागले होते. तेव्हा विकास निधी कितीही आणला तरी आपण वैद्यकीय क्षेत्रात मागे आहोत असे म्हणता येईल. तेव्हा आरोग्य खात्यात आजही तज्ज्ञ डॉक्टर आणू शकत नाही. तसेच इतर जिल्ह्यांची प्रगती वेगळी आहे असे नाही. तेव्हा विविध तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. जेणेकरून रुग्णाला जिल्ह्याच्या बाहेर जाण्याची वेळ येणार नाही. आता पालकमंत्र्यांनी पुढाकार घेऊन सिंधुदुर्गवासीयांची ही उणीव भरून काढावी. काही गावांमध्ये रस्ता असून सुद्धा आजही गावातील अनेक वाड्यांमध्ये रस्ता नाही; फक्त पायवाट आहे. त्यामुळे त्या वाडीतील आजारी व्यक्ती पडल्यास त्याला डोलीतून घेऊन यावे लागते. बऱ्याच वेळा जास्त वेळ झाल्याने आजारी व्यक्ती दगावण्याची शक्यता असते. तेव्हा गावातील प्रत्येक वाडीत गाडी जाईल इतका रस्ता असणे गरजेचे आहे. काही वाड्यात जाण्यासाठी जमीन मालक परवानगी देत नाहीत. त्यामुळे रस्ते झालेले नाहीत. तेव्हा सर्वांच्या सहमतीने जर पायवाट असेल तर रुंदीकरण करण्याला काय हरकत आहे. तेव्हा अशा सार्वजनिक कामासाठी गावकऱ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे.

सध्या उन्हाळा सुरू असून, त्यात ढगाळ वातावरण, काही ठिकाणी पाऊस पडून नागरिकांचे नुकसान झाले आहे. त्यात पाणीटंचाई, काही ठिकाणी फक्त दोन पाण्याचे हंडे मिळतात. तिसरा हंडा घेतला तर दंड भरावा लागतो. काही गावात सार्वजनिक नळ असून सुद्धा तीन ते चार दिवसांनी अर्धा तास पाणी नळाला येते. त्यामुळे काही गावातील नागरिक आपल्या वस्तीच्या आसपास असलेल्या नदीत डुरके मारून ग्लासाने हंड्यात पाणी भरत असल्याचे चित्र दिसत आहे. याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होणार आहे. जागतिक जल परिषद सांगते मनुष्याला दिवसाला एकशे पन्नास लिटर पाण्याची आवश्यकता असते. आता सर्वांनी विचार करा की, अशी परिस्थिती आपल्या राज्यात असेल तर प्रत्येकाला दिवसाला किती लिटर पाणी मिळणार आहे याचा विचार राज्यातील सुजाण नागरिकांनी करणे गरजेचे आहे. गावात रेशनिंग दुकान आहे. त्यामध्ये आवश्यक धान्य मिळते का? त्यात आनंदाचा शिधा सुद्धा बंद झाला. मग गरिबांचा सण सुद्धा अंधारात जाणार आहे. त्याचा लाभ राज्यातील १ कोटी ६३ लाख लोकांना मिळत होता. यामध्ये एक किलो रवा, एक किलो साखर, एक किलो चना डाळ आणि एक लिटर पामतेल १०० रुपयांमध्ये रेशनकार्ड धारकांना मिळत होते. कारण रखडलेल्या गरिबांच्या कामाला हा मोठा आधार होता. अनेक ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम चालू आहे, तर काही ठिकाणी चालू केलेले काम बंद आहे, तर म्हणे अनुदान संपले आहे. पुढील वर्षी पाहू. ज्या ठिकाणी पाणीटंचाई निर्माण होत आहेत. त्या ठिकाणी विहीर खोदण्याचे काम चालू आहे. मात्र अनुदान असून सुद्धा मिळालेल्या अनुदानात विहिरीचे काम पूर्ण होणार नसल्याने विहिरीचे काम अपूर्ण राहते. अशा वेळी शासन पातळीवर पुरेसे अनुदान देऊन वेळीच पूर्ण काम करावे. आता ज्याठिकाणी विहिरीचे काम अपूर्ण आहे ते पूर्ण करणे गरजेचे आहे. दलित वस्तीत अलीकडे समाज मंदिर बांधले जात आहे. मात्र अपुऱ्या निधीअभावी वेळीच समाज मंदिर बांधले जात नाही. आजही काही ठिकाणी अपुऱ्या अवस्थेत समाज मंदिर दिसत आहेत. तेव्हा जेथे लोकवस्ती जास्त आहे त्या ठिकाणी जरूर समाज मंदिर बांधावे. केवळ अनुदान खर्च करण्यासाठी समाज मंदिर बांधू नयेत. आज काही ठिकाणी समाज मंदिर धूळ खात पडली आहेत. याचा सुद्धा विचार होणे आवश्यक आहे.

खेड्यात लाखो रुपये खर्च करून नळ योजना राबविल्या जात आहेत. त्यासाठी नदीच्या काठी विहीर बांधून त्याचे पाणी वाड्यांमध्ये सोडण्याचा प्रयत्न केलेला आहे. वाडीच्या बाजूला पाण्याची टाकी बसविण्यात आलेली आहे. विहिरीपासून टाकीपर्यंत पाइपलाइन केली आहे. मात्र तो पाईप टाकीला जोडलेला नाही किंवा टाकीला नळ बसविलेला नाही. मग सांगा, अशी नळ योजना काय कामाची. नंतर ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून काय फायदा. तेव्हा ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यापूर्वी विचार करायला हवा. तेव्हा महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक गावातील मूलभूत प्रश्न अजूनही सुटलेले नाहीत.

राज्यातील गावांच्या विकासासाठी विविध शासकीय योजना राबविल्या गेलेल्या असल्या तरी त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी न केल्यामुळे राज्यात अनेक गावांमध्ये रखडलेली कामे दिसत आहेत. ग्रामीण भागात अजूनही पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो. रस्ते, साकव, पूल बांधणे, केटी बंधारे, पाणी जिरवण्यासाठी बंधारे, झाडांची लागवड, रस्त्यांची डागडुजी, वीज कनेक्शन, शेती अवजारे, मार्गदर्शन केंद्रांची उभारणी, दवाखाने, सामूहिक शेती प्रकल्प अशी अनेक कामे शासकीय अनुदानातून सुरू केलेली असतात; परंतु अपुऱ्या अनुदानामुळे किंवा अंतर्गत गटबाजीमुळे कामे रेंगाळली आहेत. तेव्हा शासकीय स्तरावर ज्या गावात शासकीय योजनांमार्फत कामे सुरू केली जातात त्यांचे मूल्यमापन करून जी कामे रखडली आहेत ती पूर्ण करून घ्यावीत.

## राशिभविष्य

शनिवार, ५ एप्रिल २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती चैत्र शुद्ध चतुर्थी शके १९४७. चंद्र नक्षत्र कृतिका. योग प्रीती. चंद्र राशी वृषभ. भारतीय सौर १५ चैत्र शके १९४७. शनिवार, दि. ५ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.२९, मुंबईचा चंद्रोदय ९.०५, मुंबईचा सूर्यास्त ०६.५३, मुंबईचा चंद्रास्त १०.३४, राहू काळ ०३.४७ ते ०५.२०. दुर्गाष्टमी, अशोकष्टमी, साईबाबा उस्तव प्रारंभ, शिर्डी, भवानी देवी उत्पती, शुभ दिवस.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : व्यवसाय-धंद्यातील उलाढाल वाढेल.

**वृषभ** : निरनिराळे लाभ होतील.

**मिथुन** : कार्यक्षेत्रात तुम्ही स्वतःचे कर्तृत्व दाखवू शकाल.

**कर्क** : व्यवसाय-धंद्यातील परिस्थिती सर्वसामान्य असेल.

**सिंह** : हाती घेतलेल्या कार्यात यश मिळण्यास वातावरण अनुकूल आहे.

**कन्या** : सामाजिक मानसन्मान मिळू शकतो.

**तूळ** : वाहने चालवताना सावध राहणे गरजेचे ठरेल.

**वृश्चिक** : सकारात्मक राहा.

**धनू** : महत्त्वाची कामे पूर्ण करू शकाल.

**मकर** : कार्यक्षेत्रात आपल्याला महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील.

**कुंभ** : राहत्या घराविषयी काही समस्या समोर येऊ शकतात.

**मीन** : यशप्राप्ती होईल स्वतःच्या प्रकृतीची काळजी घ्या.

### भजन महोत्सवास भजनप्रेमींची उपस्थिती

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे २८ ते ३० मार्च २०२५ या कालावधीत तीनदिवसीय भजन महोत्सव भायखळ्याच्या अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता. वारकरी भजन, डबलबारी भजन, दिंडी भजन, चक्री भजन, एकतारी भजन आणि भजन गायन असा भजनाचा विविधरंगी भरगच्च कार्यक्रम या महोत्सवादरम्यान आखला गेला होता. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विविध लोककलावंत भजन सादर करण्यासाठी आले होते. कणकवलीच्या पियाळी गावच्या भजन मंडळाने सादर केलेले दिंडी भजन प्रेक्षणीय होते. गायक जगदीश चव्हाण व गायिका प्रणिता देशमुख यांनीही छान भजने गायिली. सांस्कृतिक कार्य विभागाचा हा उपक्रम तसा स्तुत्यच होता. पण जवळपास ८०० प्रेक्षकक्षमता असलेल्या अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात या भजन महोत्सवास भजनप्रेमींची उपस्थिती मात्र नगण्य होती. या भजन महोत्सवाची म्हणावी तशी प्रसिद्धी झाली नसावी असे वाटते. तसेच भजनप्रेमी मराठी माणूस आणि भजन मंडळांची संख्या उपनगरात जास्त आहे. त्यामुळे असे कळते की, लोककलेचे असे बरेचसे कार्यक्रम/महोत्सव आगामी काळात सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित केले जाणार आहेत. ते आयोजित करताना कार्यक्रमस्थळ आणि कार्यक्रमाची प्रसिद्धी योग्य प्रकारे करावी म्हणजे प्रेक्षक प्रतिसादही उत्तम लाभेल.

– **दीपक काशिराम गुंडये,** वरळी

### देशभक्ती शिकविणारा कलाकार!

आपल्या चित्रपटातून देशभक्ती शिकवणारे अष्टपैलू कलाकार हरिकिशन गिरी गोस्वामी ऊर्फ मनोज कुमार यांच्या निधनाने देशभक्त शिकविणारा, देशप्रेम दाखवून देणारा दिग्दर्शक, कलाकार काळाच्या पडद्याआड गेला आहे. आपल्या कारकिर्दीत त्यांनी देशभक्त चित्रपटांद्वारे हिंदी सिनेमात एक वेगळी ओळख निर्माण केली होती. ज्यामुळे त्यांना 'भारत कुमार' म्हणून ओळखले जात होते. कृष्ण धवल ते रंगीत चित्रपटापर्यंत मनोज कुमार नेहमीच स्वतःला अव्वल असल्याचे सिद्ध केले. मनोज कुमार यांनी हिंदी चित्रपट जगतातील प्रत्येक छोट्या आणि मोठ्या कलाकारांसमवेत अभिनय केला आहे. १९९२ मध्ये त्यांना पद्मश्री आणि २०१५ मध्ये दादासाहेब फाळके पुरस्कारही देण्यात आला होता. उपकार या चित्रपटातील 'मेरे देश की धरती' हे देशभक्तीपर गीत अजरामर झाले. या चित्रपटासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकासाठी फिल्मफेअर पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर त्यांनी 'पुरब और पश्चिम, 'शोर', 'रोटी कपडा और मकान', 'संन्यासी' आणि 'क्रांती' सारख्या चित्रपटांचे दिग्दर्शिन करून अभिनयही केला होता. आपल्या अभिनय आणि चित्रपटांमधून देशभक्तीची गोडी लावणारा असा हा कलाकार आता काळाच्या पडद्याआड गेला आहे.

– **संतोष ह. राऊत,** लोणंद

जनसंवाद

### श्री रामरायांची कृपा...

श्रीराम आपले रक्षण करण्यासाठी सतत आपल्यासमवेत आहेत आणि तेच मार्गदर्शक आहेत. पाचशे वर्षे प्रतीक्षेत असणारे रामललाचे भव्य मंदिर प्रत्यक्षात साकार झाले तेव्हाच भारत देशातील दुष्ट वृत्तीच्या लोकांचे खरे स्वरूप जगासमोर यायला सुरुवात झाली आणि बाबरी मशिदीचा ढाचा कसा उभा होता आणि कसा ढासळला याचे चित्रसुद्धा रामभक्तांनी याचि देही याचि डोळा बघितले. त्याच प्रभू रामरायांच्या आशीर्वादांनी श्रीरामनवरात्रात वक्फच्या जमिनीचा निर्णयसुद्धा सहजतेने मिळाला आणि मीच श्रीरामांच्या मंदिराची पहिली वीट बसविणार म्हणणारे उताणे पडले, ज्यांची श्रद्धा हिंदूंवर आहे की मुस्लिमांवर याचा आता त्यांच्या साथीदारांना शोध घेण्याची गरज वाटू लागली आहे; कारण रामरक्षेमध्ये २२ व्यक्ती व २२ अवयवांचा उल्लेख आहे; परंतु यांच्या पक्षाकडे २२ आमदारसुद्धा नाहीत. एवढेच नाही तर राम हा शब्द रामरक्षा स्तोत्रात ८० वेळा आलेला आहे; परंतु ही मंडळी शिव्यासुद्धा ८० देऊ शकत नाहीत या अज्ञानामुळेच 'ना घर का ना घाटका' अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे म्हणून आता तरी २८८-१२८ संख्येला मान्य करून आपले अज्ञान प्रदर्शित करण्याचा घाट थांबवावा तरच रामरायाची कृपा होईल.

– **अमोल करकरे,** खेड

### न्यायालयात दाद मागण्याची सोयच नाही

वक्फ बोर्डाच्या सुधारणा विधेयकाला प्रदीर्घ वाद-विवादानंतर बहुमताने लोकसभेत संमती मिळाली आणि बोर्डाच्या कोणतीही जमीन आपली म्हणणाऱ्या मनमानीला खीळ बसवणारी प्रक्रिया सुरू झाली आहे असे आता वाटते. भारतीय रेल्वे आणि सैन्य दलानंतर तिसऱ्या क्रमांकाची सुमारे ९ लाख एकर जमिनीची मालकी ही वक्फ बोर्डाची आहे. भारतात एकूण ३० मंडळे असलेल्या या संस्थेच्या कचाट्यात चर्च, मंदिरे यांची देखील जमीन सापडली आहे. अशा प्रकारच्या अतिक्रमणाला वक्फ लवादामुळे न्यायालयात दाद मागण्याची सोय नव्हती. संविधानाला न जुमानणारा, अकार्यक्षम, अपारदर्शक आणि समाजाचा विश्वास गमावून बसलेले भ्रष्ट व्यवस्थापन असा लौकिक प्राप्त झालेल्या बोर्डावर न्यायालयीन अंकुश असेल. अमुक एक जागा ही बोर्डाचीच आहे असे एकतर्फी ठरविण्याचा अधिकार आता बोर्डाला नसेल त्यामुळे वादग्रस्त जागेबाबत बोर्डाला न्यायालयात पुरावे सादर करून आपली मालकी पटवून द्यावी लागेल अन्यथा त्या जमिनीवरील दावा सोडावा लागेल. सरकारने हे दुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर होण्याआधी ३१ सदस्य असलेल्या जेपीसीने राज्यनिहाय वक्फ बोर्डांशी बैठकीच्या माध्यमातून साधक-बाधक चर्चा करून कुठेही संशयाला जागा राहणार नाही याची आधीच काळजी घेतली होती. सहजा-सहजी पचनी न पडणाऱ्या या बदलामुळे राज्य आणि केंद्र सरकारला कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकणाऱ्या परिस्थितीवर नियंत्रण राखण्याच्या दृष्टीने देशभरात प्रचंड सावधगिरी बाळगावी लागेल!

– **हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर



# नवसर्जनतेची प्रक्रिया : थेट तुमच्या घरातून

नाट्यनिर्मिती ही संमिश्र कला असल्यामुळेच ती व्यापक आणि विविधांगी आहे आणि म्हणूनच नाट्यनिर्मिती आणि सादरीकरणाची प्रक्रिया आज बिकट झाली आहे. हौशी रंगभूमीला घर-घर लागली आहे. कलावंतांची शोधा-शोध, शेवटपर्यंत तालमीत टिकवून ठेवणे जिकिरीचे झाले आहे. ग्रामीण भागातील रंगभूमी काही अपवाद वगळता संपली आहे. आता रंगभूमी उरली आहे ती टीव्ही माध्यमातून स्थलांतरीत झालेल्या रंगकर्मींच्या बळावर सादर होणाऱ्या कलाकृतींवर आणि स्पर्धांपुरती मर्यादित...! स्वतःच्या वैयक्तिक प्रमोशनसाठी नाटक हे लाईव्ह माध्यम आहे, हे ओळखून त्याचा वापर लॉंगटर्मसाठी न करता स्वीट आणि सुटसुटीत प्रहसनात्मक सादरीकरण करुन सातत्याने प्रेक्षकांच्या "टच" मध्ये राहणे आजमितीला अनिवार्य आहे. हे नव्या पिढीच्या कलाकारांनी ओळखलंय. एखाद्या मराठी क्लासिक्सच्या मागे न लागता, एखादी चटपटीत घटना नाटक माध्यमातून फुलवली गेल्यास प्रेक्षकांनाही ती बघायला, त्याचा भाग बनायला



आवडते. एकूणच रंगभूमीसाठी हे फार आशादायक चित्र आहे असे म्हणता येईल का? तर "नवसर्जन" ही एक बदल घडवून आणली जाणारी तात्पुरती, शॉर्टटर्म प्रक्रिया आहे. आज याच प्रक्रियेचा ऊहापोह एका नाटकाच्या आनुषंगाने करायचे ठरवले आहे आणि ते नाटक म्हणजे "थेट तुमच्या घरातून"

टीव्ही माध्यमातून प्रसिद्धीला आलेले नॉन फिक्शन कार्यक्रम प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले की तीच लोकप्रियता कॅश करुन घेण्याचा ट्रेंड काही नवा नाही. पुलंच्या व्यक्ती आणि वल्लीपासून काही वर्षांपूर्वी आदेश भावोजींनी ऑन स्टेज पैठण्या वाटपापर्यंत हे फॅड पोहोचलं होतं. आपली लोकप्रियता निरनिराळ्या कार्यक्रमांच्या सुपाऱ्या वाजवून वाढवण्यापेक्षा नाटकरूपी माध्यमातून सादर झाल्यास अधिक सकारात्मक ठरते हे भान मात्र नवसर्जन घडवून आणणाऱ्या नव्या पिढीकडे आहे हे अलीकडे प्रदर्शित झालेल्या विषामृत, ठरता ठरता ठरेना, आबा की आयेगी बारात इत्यादी या नाट्यनिर्मितींवरून सिद्ध करता येईल. थेट तुमच्या घरातून ऑलरेडी हिट ठरलेल्या बिग बॉस सदृश कार्यक्रमाची पार्श्वभूमी देण्यात आली आहे. या कार्यक्रमात काय नव्हतं...! रोमँटीसिझम, हेट, संघर्ष, रडारड या कंटेंटमध्ये चिंब भिजलेल्या प्रसंगांची यादीच देता येईल एवढा मसाला दर दिवशी पाहायला मिळायचा. हाच मसाला जर नाट्यरूपाने रंगमंचावर आणला तर? कल्पना अत्यंत व्यावसायिक होती आणि प्रसाद खांडेकरांनी ती कॅश केलीय...! महाराष्ट्राची हास्यजत्रा या लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या कार्यक्रमातीलच कलाकार घेऊन एक बिग ब्रदर प्लॉट सादरीकरण म्हणजे "थेट तुमच्या घरातून."



भालचंद्र कुबल

पाचवा वेद

आपण सारेच दैनंदिन जगण्याच्या धकाधकीत एवढे गुरफटून गेलो आहोत की त्यातील अडचणींवर मात करता करता जगण्यातला आनंद जणू विसरूनच गेलो आहोत. गृहिणी असो वा करिअरसाठी स्ट्रगल करणारी युवा पिढी, घरातल्या कर्त्या पुरुषावरच अवलंबून असते. तो कर्ता झापड लावलेल्या बैलासारखा केवळ राबत राहातो. कौटुंबिक सौख्यासाठी कॉंम्प्रमाईज करत राहतो. मनःस्ताप झेलंत राहतो. यातूनही एखादी आनंदी झुळूक स्पर्शून गेली तरी समाधानी होतो. बरं ही अवस्था थोड्याफार फरकाने कुटुंबातल्या सर्वांचीच आहे. पण प्रत्येकाने आपापल्या कोषात जगायचे ठरवल्याचा जो विभ्रम दिसून येतो, तोच या नाटकाचा कणा म्हणावा लागेल.

लेखक-दिग्दर्शक आणि कलाकार म्हणून प्रसाद खांडेकरने तिहेरी भूमिका अत्यंत चोख बजावली आहे. मी त्याने विद्यार्थी दशेत केलेल्या एकांकिकांपासून ओळखतो. प्रत्येकवेळी यश मिळेलच अशी खात्री न बाळगता येणारा तो प्लॅटफॉर्म ते व्यावसायितेत हमखास यश मिळायलाच हवे यासाठी हिट केलेल्या बुल्सआयसाठी प्रसादचं कौतुक करायलाच हवं. मुळात हास्यजत्रेच्या स्किटमध्ये आणि या दोन तास वीस मिनिटांच्या नाटकात मुख्य फरक हाच आहे विनोदाच्या स्टेनेबिलिटीचा. चुटकी सरशी येणारा विनोद आणि टाळी पडणारा विनोद यातील फरक या नाटकामुळे अधोरेखित होतो. आजवर संगीत नाटकातील नाट्यपदांना वन्समोअर म्हणणारा ज्येष्ठ प्रेक्षकवर्ग आज नम्रता संभेरावने केलेल्या एखाद्या मुव्हमेंटला किंवा ओमकार राऊतने गायिलेल्या गझलला वन्समोअर म्हणणारा प्रेक्षकवर्ग तरुण झालाय. मी खरंतर फॅब्रिकेटेड (ओढून ताणून बेतलेल्या) नाटकांवर सहसा लिहीत नाही. कारण सकारात्मक लिहावे असा मुद्दा फॅब्रिकेटेड नाटकांनी केव्हाच मागे सोडलेला असतो.

प्रसंगांची विसंगती, कटेंटचा अभाव आणि फालतू पिजेंवर जो मिळेल तो प्रेक्षकवर्गाला कॅश करुन घेण्याची वृत्ती देखील बळावत चालली आहे. परंतु एक सलग स्टोरी लाईन असलेला कंटेंट या नाटकाला जगवेल हे माझे निरीक्षण सांगते. शिवाली परब जेवढी हास्यजत्रेत चुलबुली दिसते तशी मात्र इथे दिसत नाही. तिचा वावर अर्थातच जाणवत राहतो मात्र भक्ती देसाई ज्या प्रमाणात हॉट दिसलीय किंवा वावरलीय त्याला तोड नाही. शिट्टी ही केवळ भक्तीसाठीच जन्माला आली असावी इतकी ती वॉव भासते. तिचा लुक हिंदी अथवा इंग्लिश थिएटरचा आहे. शिवाय परफॉरमन्समध्ये ती कुठेही कमी पडत नाही. नम्रता संभेरावची अनेक रूपं आपण हास्यजत्रेत पाहिली आहेत पण इमोशनल ह्युमरच्या रोलर कोस्टरवर तिने अख्खं नाटक तोलून धरलंय.



प्रथमेश शिवलकर आणि शिवाली परब यांचे या नाटकातून रंगमंचावर झालेले पदार्पण अत्यंत आशावादी आहे. ज्या कॉन्फिडन्सने या नाटकाची टिम वावरते तो कॉन्फिडन्स केवळ हौशी रंगभूमीवर स्ट्रगल केलेला कर्ताच देऊ शकतो, असे प्रसाद खांडेकरबाबत म्हणावे लागेल. बाकी नेपथ्य आणि प्रकाश योजनेमुळे नाटक अधोरेखित व्हावे असे संदेश बेंद्रे आणि शाम चव्हाणांना का वाटले नसावे? हा जरा नकारात्मक विचार डोकावून जातो.

नाट्यकलेचा प्रवास कितीही वाटा वळणातून झाला असला तरी सर्जनशीलतेचे आवाहन हजारो वर्षांनंतर आजही कायम आहे. कितीही तांत्रिक प्रगती झाली तरी निर्मिती प्रक्रियेतील सर्जकता अबाधित आहे. ती सर्जकता नव्या पिढीने ज्या पद्धतीने स्वीकारली आहे त्याची संज्ञा किंवा व्याख्या करायला अजूनही काही काळ जावा लागेल परंतू हेच "नवसर्जन" असू शकते.

# पारंपरिक लावणीचा वारसा पुढील पिढीकडे



सांस्कृतिक कार्यसंचालनालय आणि 'महाराष्ट्र सांस्कृतिक मंच' यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे येथे आयोजित केलेल्या लावणी प्रशिक्षण शिबिराचा समारोप समारंभ गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे ३१ मार्च रोजी 'मराठा मंडळ, पांचपाखाडी, ठाणे' येथे सायंकाळी ५ ते ७ या वेळेत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी ॲड. निरंजन डावखरे, सदस्य विधान परिषद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिबिराच्या माध्यमातून पारंपरिक लावणीचे जतन करण्याच्या या उपक्रमाबद्दल त्यांनी आयोजकांचे कौतुक केले. 'महाराष्ट्र कला मंच'च्या सचिव शैला खांडगे यांनी गेली दहा वर्षे हे शिबीर घेऊन निरनिराळ्या प्रसिद्ध कलावंतांकडून विद्यार्थिनींना प्रशिक्षण मिळवून दिले आहे. चित्रपटांमधून आणि काही व्यावसायिक कार्यक्रमांमधून उत्तान शृंगारिक लावणीचे सादरीकरण होत असल्याने त्याचा विपरीत परिणाम होऊन लावणीचा अस्सल बाज बिघडत चालला आहे, याची नोंद घेऊन शैला व डॉ. प्रकाश खांडगे यांनी पारंपरिक लावणी म्हणजे काय असते हे नव्या पिढीसमोर ठेवायचे ठरवले. लावणीचे शास्त्रशुद्ध शिक्षण नव्या पिढीला मिळावे यासाठी प्रयत्न सुरू केले व त्याला यश येऊ लागले. या शिबिरात प्रवेश घेतलेल्या युवतींनी त्यांच्या कानावर कधी न पडलेली अशी पारंपरिक लावणी शिकण्यासाठी अथक परिश्रम केले आणि त्याचे सुंदर सादरीकरण समारोपाच्या दिवशी करून दाखवले.

ठाणे येथील या नऊ दिवसांच्या शिबिरात पारंपरिक लावणीचे प्रशिक्षण देण्यास दिग्गज कलावती आल्या होत्या. लावणीसम्राज्ञी आणि चित्रपट कलावंत मेधा घाडगे पहिल्या दिवशी प्रशिक्षण देऊन गेल्या. त्यामुळे विद्यार्थिनी खूष झाल्या. मोठे कलावंत म्हणजे काय चीज असते, त्यांची कलेप्रतीची लगन कशी असते आणि नवीन मुलींना प्रशिक्षण देण्यासाठीही ते आपला वेळ देऊ शकतात, या गोष्टी पाहून विद्यार्थिनी भारून गेल्या होत्या. प्रशिक्षक आणि महाराष्ट्र सांस्कृतिक मंचच्या अध्यक्ष डॉ. सुखदा खांडगे यांनी तमाशा म्हणजे काय व त्यात गवळण कशी येते, त्यातून मधुरा भक्ती कशी दिसते यावर विवेचन करून विद्यार्थिनींना गवळण शिकवली. राधा कृष्ण यांच्या रूपकावरील गवळण मुलींना फार आवडली. अभिनेत्री प्रमिला लोदगेकर यांनी प्रशिक्षण देताना लावणीच्या अनेक अदा शिकवल्या. चित्रपट अभिनेत्री म्हणून कोणताही अभिमान न बाळगता प्रमिला, मेधा घाडगे, वैशाली जाधव या शिक्षिका बनून विद्यार्थिनींमधे मिसळत होत्या. पारंपरिक लावणीचे जतन होते आहे हे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य होते.

या शिबिरात प्रशिक्षण घ्यायला आलेल्यात महाविद्यालयीन विद्यार्थिनी तर होत्याच; परंतु काही साठी ओलांडलेल्या महिलाही होत्या. पण सर्वांची जिद्द आणि शिकण्याचा उत्साह मात्र सारखाच होता. एखाद्या कलेवर प्रेम असले तर वयाचा विसर पडतो हे वयस्क विद्यार्थिनींनी जोषात सादर केलेल्या नृत्यावरून लक्षात आले. काही महिला डॉक्टर, वकील अशा व्यवसाय करणाऱ्या होत्या; परंतु लावणीचे शिक्षण घेता यावे यासाठी त्यांनी आपला व्यवसाय दहा दिवस बंद ठेवला होता. एकूण पंचेचाळीस विद्यार्थ्यांमध्ये दोन मुलगेही होते. ते शिबिराला रोज नाशिकहून ये जा करत होते. समारोप समारंभात त्यांनीही नऊवारी साडी आणि लावणीचा सर्व साज लेऊन मनापासून सादरीकरण केले.



फिरता फिरता

मेघना साने

पारंपरिक लावणी सादर करताना ते काव्य आणि नृत्य यांचा संगम म्हणून सादर केले जाते. यात वादकांना फार महत्त्व आहे. ते स्टेजवर एका बाजूला बसून वाजवत असतात. त्यांच्या वादनामुळेच सादरीकरणात रंगत येत असते. या नऊ दिवसांच्या शिबिरातही शैला खांडगे व डॉ. सुखदा खांडगे यांनी अत्यंत अनुभवी अशा वादकांना आमंत्रित करून त्यांची साथसंगत प्रशिक्षणार्थींना मिळवून दिली. ज्या ढोलकीपटू ज्ञानेश्वर ढोरे व पेटीवादक सुभाष खरोटे यांनी दादा कोंडके, शाहीर साबळे, विठ्ठल उमप अशा दिग्गजांना अनेक वर्षे साथ केली ते या शिबिरात साथसंगतीसाठी उपस्थित होते. याशिवाय पूजा सावंत व प्रीती तोरणे या दोन गायिकांनी लावणीला नाट्यमय गाण्याची साथ केली. गायन व वादन प्रत्यक्ष होत असल्याने सहभागी विद्यार्थ्यांचा जोश अधिकच वाढला होता.

कार्यक्रमाच्या अखेरीस सर्व सहभागी विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, गायकांना व वादकांना प्रशस्तीपत्र देण्यात आले.

हे शिबीर विद्यार्थ्यांसाठी मोफत होते. पण म्हणून कोणीही नऊ दिवसात दांडी मारली नव्हती. अत्यावश्यक काम असल्यासच रजा घेतली होती. शिबिरातही वेळ वाया जाऊ नये याची खबरदारी शैलाताईंनी घेतली होती. आयोजक म्हणून त्या रोज जातीने उपस्थित होत्या. सर्व युवतींच्या बोलण्यावरून त्या लावणीकडे एक कला म्हणून पाहत आहेत असे दिसून येत होते.

लावणीचा उगम पंधराव्या-सोळाव्या शतकात झाला असला तरी एकविसाव्या शतकात ती ताजीतवानी आहे. अभिनेत्री मेधा घाडगे, प्रमिला लोदगेकर, वैशाली जाधव यांचे युट्यूबवरील किंवा अनेक मोठ्या रंगमंचावरील सादरीकरण पहिले तर लक्षात येते की लावणीची जवानी अजून टिकून आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत लावणी ही फडात किंवा जत्रेतच सादर केली जायची. पण डॉ. प्रकाश खांडगे व शैला खांडगे या लोककलेवर निस्सीम प्रेम करणाऱ्या दांपत्याने महाराष्ट्रात लोककलेचे महोत्सव सुरू केले. गावातील अनेक लोककलावंतांना, लावणी नर्तिकांना त्यांनी शहरी रंगमंदिरात आणले. त्यामुळे गायन, वादन, नृत्य, अभिनय या साऱ्याचा संगम असलेली ही शृंगार किंवा भक्तिरसाची शिंपण करणारी लावणी लोकांना बघायला मिळाली. रवींद्र नाट्यमंदिर, शिवाजी मंदिर, षण्मुखानंद अशा अनेक मोठ्या रंगमंदिरात लोककला महोत्सव किंवा महिला लोककला महोत्सव होऊ लागले. सरकारने पाठिंबा दिला व प्रायोजकही मिळू लागले. लावणी बहराला आली. अनेक लोककलावंतांना प्रसिद्धी मिळाली. हा सारा इतिहास माझ्या डोळ्यांसमोरच घडला आहे. या महोत्सवांमध्ये निवेदन करण्याची संधी मला मिळाली होती.

लोककलेला मानसन्मान मिळवून देण्याचे कार्य खांडगे पती-पत्नींनी गेली पंचवीस वर्षे सुरूच ठेवले आहे. त्यांच्यासोबत या उपक्रमांमध्ये सातत्याने असलेले डॉ. गणेश चंदनशिवेही प्रशिक्षक म्हणून या शिबिरात येऊन गेले. त्यांनी लावणीची थिअरी शिकवली. तेजश्री सावंत आणि हेमाली शेडगे यांनी काही पारंपरिक लावण्या बसवल्या. समारोपाच्या दिवशी संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन तेजश्रीने अतिशय सुंदर रीतीने केले.

meghanasane@gmail.com

# चांगल्या भूमिकेच्या शोधात

'मिशन अयोध्या' चित्रपटामध्ये शिक्षिकेची भूमिका करून प्रेक्षकांची मने जिंकणारी अभिनेत्री म्हणजे तेजस्वी पाटील. चांगल्या भूमिका करण्याचे तिचे स्वप्न आहे.

तेजस्वीच शालेय शिक्षण सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला विद्यालयात झाले. ती स्पोर्ट्समध्ये होती. कुडाळमधील एस. आर. एम. कॉलेजमधून वाणिज्य शाखेतून पदवी घेतली. कुडाळमध्ये तिने फॅशन शोमध्ये भाग घेतला. चार-पाच जिल्ह्यांचा मिळून एक फॅशन शो झाला होता. त्याची फायनल कोल्हापूरला झाली होती. ती स्पर्धा ती जिंकली होती. त्यानंतर ती एम. बी. ए. करण्यासाठी पुण्याला आली. तिचं लग्न ठरलं. लग्न ठरतानाच तिच्या पतीने तिची आवड विचारली होती, तिने ॲक्टिंगची आवड असल्याचे सांगितले होते.



टर्निंग पॉइंट

युवराज अवसरमल

लग्नानंतर तिने मुंबई गाठली होती. 'आपल ठेवा झाकून' या नाटकात तिने अभिनेते सतीश तारे सोबत काम केले. त्याच वर्षी जेमिनी कुकिंग ऑईलची जाहिरात तिने केली. 'प्राजक्ता 'नावाची मालिका तिला मिळाली. 'प्रेमाचा झोल झालं' नावाचा चित्रपट मिळाला. त्यामध्ये अभिनेता सिद्धार्थ जाधव सोबत तिने काम केले. 'अगडबंब', 'एक अलबेला ' हे चित्रपट तिने केले. 'स्वाभिमान 'नावाची मालिका केली.

'मिशन अयोध्या' या चित्रपटात तिची स्वाती नावाच्या शिक्षिकेची भूमिका आहे. विद्यार्थ्यांशी हसून खेळून राहणारी, त्यांच्या चांगल्या बाबींना ती सपोर्ट करते. शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांची अयोध्येला जाण्याची सहल आयोजित करतात. त्या ठिकाणची संस्कृती जाणून घेण्यासाठी ती सहल आयोजित केली जाते. त्या सहलीमध्ये ती सहभागी होते. मे महिन्यात या चित्रपटाचे शूटिंग करण्यात आले होते. त्यावेळी तेथील तापमान खूप गरम होते. त्यांना सकाळी लवकर शूटिंग करायला लागायचे. चित्रीकरणासाठी परवानगी घ्यावी लागली. सगळ्यांनी एकमेकांना सांभाळून घेतले. श्री प्रभू रामांचे दर्शन झाले. मिशन अयोध्या हा चित्रपट त्यांच्या जीवनातील टर्निंग पॉइंट ठरला आहे.



तेजस्वी पाटील

# प्रयोगशील 'अंधारदरी'त डोकावताना...

मराठी रंगभूमीवर व्यावसायिक नाटकांसोबतच प्रायोगिक नाटकेही सादर होत असतात. अनेकविध प्रयोगांची खाण म्हणून प्रायोगिक रंगभूमीकडे पाहिले जाते. प्रायोगिक नाटकांतून आलेले अनेक कलाकार आज व्यावसायिक रंगभूमीवर स्थिरावलेले दिसतात. प्रायोगिक नाटकांचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे विविध प्रकारच्या विषयांना त्यात हात घालता येतो आणि असे विषय रसिकांपर्यंत, किंबहुना समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न पोटतिडिकीने केला जातो. यातूनच अनेक विषय रंगभूमीच्या मुख्य प्रवाहात येऊ शकतात आणि त्यांना विस्तृत अवकाश प्राप्त होऊ शकते.



सध्या प्रायोगिक रंगभूमीवर 'अंधारदरी' नामक एक दीर्घांक त्याच्या शीर्षकामुळे विशेष लक्ष वेधून घेत आहे. एका सामाजिक विषयाला या नाटकाच्या माध्यमातून रंगभूमीचे दार खुले झाले आहे. युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक प्रणव सखदेव यांच्या 'आठवलेची एक आठवण' या कथेवर हे नाटक आधारित आहे. या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन महेंद्र डोंगरे यांनी केले आहे. श्रीनिवास ओक, प्रज्ञा गरीबे, डॉ. सुनील घोणे, क्षितिज भंडारी, गोकुळ राठोड आदी कलाकार या नाटकात भूमिका साकारत आहेत. अचूक पात्र निवड, सहजाभिनय, मर्यादित स्वरूपाचे संगीत, प्रकाश व नेपथ्य यातून हे नाटक प्रयोगशील होईल, याची दक्षता या नाटकमंडळींनी घेतली आहे.


'अंधारदरी' हे नाटक लिहिण्यामागे काय विचार होता याविषयी महेंद्र डोंगरे यांच्याशी संवाद साधला असता ते सांगतात, "राजकीय, आर्थिक व सामाजिक बातम्यांच्या सततच्या पुनरावृत्तीमुळे संवेदनशीलता बोथट होऊन गेली होती. त्यातच अधूनमधून, मॅनहोलमध्ये गुदमरून झालेले सफाई कामगारांचे मृत्यू; अशा पद्धतीच्या बातम्या मनातील संवेदना चाळवत होत्या. सन २०१७ मध्ये मुसळधार पावसामुळे पाण्याखाली गेलेले रस्ते व त्यात उघड्या राहिलेल्या मॅनहोलमध्ये बुडून एका डॉक्टरांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर माझ्या अबोध मनात साचलेल्या असंख्य सफाई कामगारांचे मॅनहोलमध्ये उतरून काम करताना झालेले मृत्यू फेर धरू लागले. नकळत मॅनहोलमध्ये काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांबद्दल सहानुभूती वाटू लागली. याच काळात, युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक प्रणव सखदेव यांची कथा वाचनात आली. ही कथा मॅनहोलमध्ये गुदमरून मरण पावलेल्या सफाई कामगारांचे मनोगत मांडत होती. मी नाट्यक्षेत्रात कार्यरत असल्याने, यावर एखादे नाटक लिहावे असे मला वाटू लागले आणि त्यावर एक-दीड तासाचा दीर्घांक लिहून काढला. या लेखनाच्या दरम्यान सफाई कामगारांचे जगणे, त्यांच्या कथा आणि व्यथा, त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर; या सगळ्याचा अभ्यास होत गेला.



राजरंग

राज चिंचणकर

कलावंत या नात्याने आणि सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून मी हा दीर्घांक बसवायला घेतला. मूळ कथेत अंतर्भूत असलेला आशय, सामाजिक विषमता, शिक्षणव्यवस्था आदी गोष्टींची सरमिसळ होऊन गरीब-श्रीमंत यातली सहजतेने न दिसणारी खोल दरी, असे चित्र डोळ्यांसमोर उभे राहिले आणि मला 'अंधारदरी' हे नाटकाचे शीर्षक सुचले. आम्ही या नाटकाचे पाच प्रयोग केले आणि सहा एकांकिका स्पर्धांमध्ये भाग घेतला. प्रयोगांना समाधानकारक प्रतिसाद मिळाला; पण तळमळून, कधी अश्रू ढाळून, कधी निःशब्द होऊन त्यातल्या काही प्रेक्षकांनी हृदयाला भिडणारा प्रतिसाद दिला. कुठेतरी एक महत्त्वाची सामाजिक समस्या मांडल्यामुळे, प्रयोग पाहिलेल्या सगळ्यांना नाटक मात्र खूप भावले".



या नाटकाचा उद्देश स्पष्ट करताना महेंद्र डोंगरे म्हणतात, "आपली भौगोलिक, सामाजिक परिस्थिती व यातून आलेली मानवनिर्मित अशी कला किंवा नाटक अजूनही जिवंत आहे. पण कलेचा हा प्रवाह काहीसा गढूळ झालेला दिसतो. बाजारीकरणाच्या विळख्यात सापडलेली नाट्यकला; तिचा अस्सलपणा पडताळून पाहणे अशक्य झाले आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीवर आधारलेली आपली राज्यघटना देशातल्या प्रत्येक नागरिकाला समान कायदा, समान स्वातंत्र्य, समान बंधुता यांचे हक्क देऊन समाजात एकोपा, आनंद व सुख नांदावे; याकरिता आग्रही आहे. पण प्रत्यक्षात तसे दिसते का, हा प्रश्न आहे. आपण नक्की काय करत आहोत, कुठे जाणार आहोत; याची जाण हरवलेला माणूस समाजातल्या विषमतेबद्दल या नाटकामुळे अंशतः तरी विचार करेल. माझ्या कर्तव्यशील भावनेने मी हे नाटक केलेले आहे. यात समाजाच्या दोन टोकांमधली विषमता तौलनिक विचारांद्वारे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे".

# विवाहिता आणि बाहुली, काय आहे यामागील गूढ?

ए अँड एन सिनेमाज एलएलपी आणि ए ३ इव्हेंट्स अँड मीडिया सर्व्हिस प्रॉडक्शन प्रस्तुत 'जारण' चित्रपट येत्या ६ जून २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे रहस्यमय मोशन पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित झाले आहे. या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन हृषीकेश गुप्ते यांनी केले असून अमोल भगत आणि नितीन भालचंद्र कुलकर्णी यांनी निर्मितीची धुरा सांभाळली आहे. मोशन पोस्टरमध्ये एका विवाहितेच्या हातात बाहुली दिसत असून तिला टाचण्या टोचलेल्या आहेत. सोबतच पार्श्वभूमीला ऐकू येणाऱ्या




रोमांचक संगीतामुळे हे मोशन पोस्टर थरारक अनुभवही देत आहे. यावरून हा चित्रपट जादूटोण्यावर आधारित तर नसेल? असा प्रश्न जर प्रेक्षकांना पडला, तर हे जाणून घेण्यासाठी थोडी प्रतीक्षा करावी लागणार आहे. दिग्दर्शक हृषीकेश गुप्ते म्हणतात, 'हा एक कौटुंबिक भयपट आहे. करणी, जारण यासारख्या गोष्टींमुळे एका कुटुंबाला सहन करायला लागणाऱ्या यातना हा चित्रपट मांडतो. मानवी भावनांचा आणि दुहेरी आयुष्याचा शोध घेणारा प्रवास आहे. प्रेक्षकांना एक वेगळा भयगूढ अनुभव देण्याचा प्रयत्न आम्ही 'जारण'मधून केला आहे.

# सिक्कीममध्ये चित्रित होणारा पहिला भारतीय चित्रपट 'बंजारा'

परदेशात चित्रीकरण करणे हे मराठी सिनेसृष्टीसाठी आता काही नवीन राहिलेले नाही; परंतु भारतातीलच एक असे ठिकाण जे समुद्रसपाटीपासून हजारो फूट उंच, ऑक्सिजन पातळी अगदी कमी, जिथे हवामान कधी बदलेल याचा नेम नाही, अशा ठिकाणी चित्रीकरण करणे हे निश्चितच आव्हानात्मक आहे आणि हे ठिकाण आहे भारताच्या ईशान्य भागातील सिक्कीम. स्नेह पोंक्षे दिग्दर्शित 'बंजारा' या चित्रपटाचे चित्रीकरण हे निसर्गरम्य सिक्कीममध्ये झाले आहे. त्यामुळे 'बंजारा' हा केवळ



मराठीच नाही तर भारतीय सिनेसृष्टीतील पहिला चित्रपट आहे, ज्याचे चित्रीकरण सिक्कीममध्ये झाले आहे. यापूर्वी 'बंजारा' चित्रपटाचे पोस्टर, टिझर प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. यात सिक्कीमचे मनमोहक सौंदर्य आणि मित्रांची बाईक राईड बघून अनेकांना खूप छान वाटले असेल. हे पडद्यावर जितके सहज, सुंदर दिसत असले तरी या ठिकाणी चित्रीकरण करणे, हे प्रचंड आव्हानात्मक होते. याबाबतचा अनुभव चित्रपटाचे दिग्दर्शक स्नेह पोंक्षे यांनी शेअर केला आहे.

दिग्दर्शक स्नेह पोंक्षे म्हणतो, हे एक असे चित्रीकरण स्थळ आहे, जिथे आजवर कोणत्याच चित्रपटाचे चित्रीकरण झालेले नाही. ही जागाच अशी आहे, की कोणालाही प्रेमात पाडेल. आम्ही सुमारे १४,८०० फूट उंचीवर चित्रीकरण केले आहे, जिथे खूप कमी ऑक्सिजन होता. आम्ही अक्षरशः ऑक्सिजन स्प्रे व कपूर वापरत होतो. एकतर हवामानाचा काहीच अंदाज नाही. क्षणात उजाडलेले असायचे तर क्षणात पाऊस यायचा. आमचे नऊ दिवसांचे शेड्यूल होते आणि या काळात बराच पाऊस पडला. शेड्यूल बदलू शकत नसल्याने कसंबसं शूटिंग पूर्ण केले. सुमारे दीडशेची टीम घेऊन आम्ही तिथे गेलो होतो आणि तिथली जवळपास शंभरच्या वर लोकं होती. या सगळ्यांसाठी आम्हाला इंडियन आर्मीचे खूप सहकार्य लाभले.

# भिम गीतांनी पेटविल्या क्रांतीच्या मशाली

**सांस्कृतिक** | जयभिम महोत्सवात संगीत रजनीला प्रतिसाद







पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:मानवाला मानवाचे अधिकार मिळवून देणारे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विश्वातल्या अनेक देशात साजरी होते. त्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त शनिवार (दि.५) एप्रिल रोजी लढा बा भिमाचा संगीत रजनी कार्यक्रमास उपस्थित जनतेने भरभरुन दाद दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे ४ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या जयभिम महोत्सवात शनिवार (दि.५) एप्रिल रोजी प्रा.दिपक जमदाडे,ड. नितीन वाघमारे यांचा 'लढा बा भिमाचा संगीत रजनी कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड.रोहिदास येवले तर प्रमुख पाहुणे म्हणून ड.अविनाश गडगे आदी उपस्थित होते. या भिमगित कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव इनकर यांनी तर आभार विश्वमाला इनकर यांनी मानले.हा संगीत रजनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे परिश्रम घेतले.

### आज असे होणार कार्यक्रम

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे, आज रविवार (दि.६) रोजी सकाळी ११ ते ५ यावेळेत भीमगित गायन स्पर्धा तर तुलसी संगणक महाविद्यालयात येथे सकाळी १० ते सायंकाळी ६ यावेळेत १० हजार विद्यार्थ्यांची महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा होणार आहे.

# झेडपी सीईओंनी एकदा दणका दाखवावा!

प्रश्नचिन्ह:सुशांत खौतड गुत्तेदारावर कारवाई कधी?




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील बेलगाव मध्ये जल जिवन काम बोगस गुत्तेदाराने जलजिवनचे काम बोगस केले आहे म्हणजे ज्या जलजिवन योजनेचे काम आले होते पण कामच झाले नाही गुत्तेदार पेसै खाऊन मोकळा बेलगाव मध्ये जलजिवनचे काहीच काम नाही सुशांत खवतड नावाचा गुत्तेदार बील ही उचलतो तर मग अधिकारी काय झोपा काढतात काय जलजिवनची पाईप लाईन करण्यासाठी आलेल्या नळ्या सुध्दा त्या सुशांत खवतड नावाच्या गुत्तेदाराने गेली एक वर्षापासुन गायप केल्या आहेत केज तालुक्यातील अनेक गावांमध्ये विजय कन्स्ट्रक्शन कंपनीने भोगस कारभार करुन अनेक गावांमध्ये त्या गुत्तेदारानी जलजिवनच्या कामात कोट्यवधी रुपयांचा निधी हडपला आहे त्यांच प्रमाणे बेलगाव मध्ये तर काहीच काम केले नाही अशा भोगस काम करणाऱ्या गुत्तेदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकले पाहिजे नेमकं बेलगाव येथे जल जीवन चे काम करणाऱ्या या गुत्तेदाराला कोणत्या नेत्याच अभय आहे या गुत्तेदाराने जलजीवन च्या नावाखाली कोठ्याधिश रुपयाचा निधी हडप केला आहे या वर तात्काळ कारवाई झाली इतक्या कडक उन्हाळ्या मध्ये फक्त अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे गावाला पाणी पिण्यासाठी नाही सुशांत खवतड नावाच्या गुत्तेदारावर तात्काळ कारवाई करा अशी मागणी बेलगाव मधील नागरिक करीत आहेत.

# पंकजाताई आ.नमिताला आवरा!

चर्चा: जनता उपस्थित करु लागली प्रश्न

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांनी चक्क केज तालुक्यात परळीच्या आकाचे पॅटर्न वापरायला सुरुवात केली आहे त्यामुळे केज अंबाजोगाई मतदार संघातील जनता हैराण झाली आहे जसे की मागिल काही दिवसांपूर्वी निवडणुकीत विरोध केला म्हणून चांगल्या अधिकाऱ्यांचे निलंबन केले तसेच त्यांच्या विरोधात कोणी तक्रार केली तर त्याला मारहाण करायला लावणे व नंतर ज्याला मारहाण केली त्यांच्या वरच गुन्हा दाखल करणे जर अधिकाऱ्यांनी त्यांच ऐकल नाही तर त्यांची चौकशी लावणे तसेच निलंबित करण्याच्या धमक्या देने अशा प्रकारचे त्रास केज अंबाजोगाई मतदार संघातील अधिकारी, जनतेला देण्याचे काम आमदारा नमीता मुंदडा यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा केजचे छोटे आका करत आहेत त्यामुळे पालकमंत्री पंकजाताई मुंडे तुम्ही पक्षातील नव्हे तर महाराष्ट्राच्या जनतेचे मत ओळखुन घेणाऱ्या समझदार नेत्या आहेत त्यामुळे तुम्ही केज अंबाजोगाई मतदार संघात आमदारा नमीता मुंदडा व आमदारा सासरे नंदकिशोर मुंदडा यांनी परळी पॅटर्न राबवत आहेत त्यामुळे अशा निच प्रकारे वागत असलेल्या आमदारा नमीता मुंदडा व आमदारा सासरे नंदकिशोर मुंदडा यांना पान २ वर

# साक्षी वीर एमबीबीएस उत्तीर्ण

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:साक्षी सुभाष वीर हिने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे च.इ.इ.ड. पूर्ण केले. ती सुभाष किशनराव वीर यांची मुलगी असून पाली तालुका बीड येथील रहिवासी आहे.या यशाबद्दल तिचे पाली ग्रामस्थ, शिक्षक नेते केशव आठवले,दिनकर जोगदंड,विकास वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते अजित डोंगरे,लेखा व वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ, अशोक शेजुळ, गणेश चव्हाण, शिलवंत सर,अर्जुन घुमरे यांनी या यशाबद्दल अभिनंदन केले. व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# तांत्रिक विश्लेषणातून मोबाईलचा शोध!

तत्पर: संभाजीनगर पोलिसांची कामगिरी

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी: पोलीस ठाणे संभाजीनगर, परळी वै. पोलीसांनी वेगवेगळया कंपनीचे एकुण १३ गहाळ मोबाईलचा शोध घेवून तक्रारदार यांना परत केले आहेत. परळी येथील संभाजीनगर पोलीस ठाणे येथे नागरिकांचे मोबाईल गहाळ झाले बाबतच्या तक्रारी प्राप्तं होत असल्याने सदर तक्रारीचे अनुषंगाने गहाळ मोबाईलचा तांत्रिक विश्लेषणाव्दारे शोध घेणे कामी संभाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक धनजंय ढोणे यांनी पोउपनि अनिल शिंदे, पोअं/ १४६ खाडे यांना आदेश दिलेले होते.

त्याप्रमाणे पोउपनि शिंदे व पोअं/ १४६ खाडे यांनी संभाजीनगर, परळी पोलीस ठाणे येथील प्राप्तं गहाळ मोबाईल तक्रारी मधील गहाळ मोबाईलचा तांत्रिक विश्लेषणाव्दारे शोध घेवून वेगवेगळ्या कंपनीचे एकुण ३१ मोबाईल १)एक Realme कंपनीचा C53 मोबाईल किं. अं.८०००/-रू, २) एक सॅमसंग कंपनीचा Galexy १५ मोबाईल किं.अं.१७०००/- रू. ३) एक विवो कंपनीचा Y27 मोबाईल किं. अं. १२,०००/- रू ४) एक ओपो कंपनीचा मोबाईल किं. अं.१४,०००/- रू, ५ ) एक ओपो कंपनीचा मोबाईल किं. अं. १५,०००/- रू ६ ) एक विवो कंपनीचा त१७ मोबाईल किं.अं. २०,०००/- रू, ७ ) एक Realme कंपनीचा N53 मोबाईल किं. अं.९०००/-रू, ८) एक रेडमी कंपनीचा मोबाईल किं.अं. ८०००/- रू. ९)एक Oppo कंपनीचा ३८ मोबाईल किं. अं.१२,०००/-रू,१०)एक सॅमसंग कंपनीचा ५७ मोबाईल किं. अं.५०,०००/- रू, ११ ) एक रेडमी कंपनीचा मोबाईल किं. अ.१२,०००/- रू, पान २ वर

# शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेने मारली बाजी

अभिनंदनिय:लाल बहादूर शास्त्री विद्यानिकेतन शाळेचे यश



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:धाराशिव जिल्ह्यातील लाल बहादूर शास्त्री विद्यानिकेतन, खेड ही प्रशाला जिल्ह्यात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा म्हणून प्रसिद्ध आहे. दरवर्षी खेड प्रशालेचे विद्यार्थी छ्चचड शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवत असतात. हीच परंपरा या वर्षीही कायम ठेवण्यात प्रशालेला यश मिळाले आहे. विशेष म्हणजे,आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या प्रवर्गातून (EWS) प्रशालेचे ३ विद्यार्थी संपूर्ण जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत येऊन शिष्यवृत्तीधारक धारक झालेले आहेत. यामध्ये शाळेतून आठवी छ्चचड शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथम क्रमांक प्राप्त करून जिल्हा गुणवत्ता यादीत तिसरा क्रमांक मिळवण्याचा मान आदर्श सचिन लोमटे, तसेच गायत्री गणेश लोमटे,(९वा ) अभय बिभीषण गवाड (१९वा )यांनी मिळवला.व इतर १० विद्यार्थी छ्चचड सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. यामध्ये गरड शौर्य श्रीकांत,गरड सार्थक विक्रम, दांगट श्रावणी धर्मराज, जगताप समर्थ संभाजी, मोरे गौरी दीपक,जाधव गार्गी किशोर,पाटील सिद्धी किरण, गरड नंदिनी संजय,कदम अजित बाळासाहेब,लोमटे परीस रवींद्र यांचा समावेश आहे. या यशाबद्दल यशवंत विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे संस्थेचे पान २ वर

# टंचाई गस्त गावात टँकर सुरु करा

शाहु डोळस:बीड जिल्हा प्रशासनास मागणी

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड: जिल्ह्यातील टंचाई गस्त गावात भीषण पाणी निर्माण झाली झालेली आहे, तरी प्रशासनाकडून पाणी टंचाई वर कुठलीही ठोस उपाययोजना नसल्याने पाणी टंचाई झळा सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहेत. सद्या उन्हाचा तडाखा वाढल्याने कित्येक गावात पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागत होती त्यामुळं प्रशासनाकडून जिथं मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाली आहे. त्या दलीत वस्ती, गावं, वाडी आदी ठिकाणी तात्काळ टँकर सुरू करा अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने जिल्हाधिकारी साहेब यांच्या कडे व युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष पप्पुजी कागदे नेतृत्व पान २ वर

# केजमध्ये जयभिम महोत्सवाचे आयोजन

नियोजन:विविध कार्यक्रमांची रेलचेल

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:शहरातील महात्मा फुले नगर, आंबेडकर नगर, हौसिंग कॉलनी भागातील भीमजन्मोत्सवाच्या रौप्यमहोत्सवा निमित्त यावर्षी ६ एप्रिल रविवारपासून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये निबंध स्पर्धा, सामान्य ज्ञानस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भीमगीत गायन स्पर्धा, रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबीर व दहा एप्रिल गुरुवारी संध्याकाळी महाराष्ट्राच्या सुप्रसिध्द गायिका समाज भुषण कडूबाई खरात यांच्या भिमगीत गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व होणा-या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे अशी विनंती भिमजंयती उत्सव समीतीचे अध्यक्ष निखील समुद्रे व सचिव निखील गायकवाड आणि एल.एफ. सी. ग्रुपच्या वतीने करण्यात आली आहे. केज शहरातील महात्मा फुले नगर, आंबेडकर नगर, हौसिंग कॉलनी भागातील भीमजन्मोत्सव समितीच्या वतीने गेल्या २५ वर्षांपासून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भीमजन्मोत्सव साजरा करण्यात येतो. या वर्षी भीमजन्मोत्सवाच्या रौप्यमहोत्सव असल्याच्या निमित्ताने महात्मा फुले नगर भागात ६ एप्रिल रविवार पासुन ते १४ एप्रिल पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये लहान मोठ्या विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पधा, वक्त त्व स्पर्धा, भीमगीत खुली गायन स्पर्धा, रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत यशस्वी होणाऱ्यांना आकर्षक बक्षीस दिले जाणार आहे. दि.१० एप्रिल गुरुवारी संध्याकाळी महाराष्ट्राच्या सुप्रसिध्द गायिका समाज भुषण कडुबाई खरात यांचा भिम गीतांचा कार्यक्रम, दि.११ एप्रिल शुक्रवारी संध्याकाळी पान २ वर

**आ. त्र्यंबक भिसे** | लखमापुर येथे क्रिकेट चषक स्पर्धा

# ग्रामीण भागातही खेळाडू उत्कृष्ट

पुण्यभूमी प्रतिनिधी



रेणापूर:ग्रामीण भागातही विविध खेळात खेळणारे उत्कृष्ट खेळाडू आहेत. पण त्यांना योग्य वेळी संधी मिळत नसल्याने मागे राहतात. त्यामुळे लातुर ग्रामीणचे माजी आ. धिरज देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लखमापुरचे माजी उपसरपंच महेश शिवाजी खाडप व युवक मित्र मंडळाच्या वतीने आमदार चषक २०२५ चे आयोजन करून ग्रामीण भागातील उत्कृष्ट क्रिकेट खेळाडूना संधी व प्रोत्साहन मिळावे यासाठी आमदार चषक स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याचे प्रतिपादन उद्घाटन प्रसंगी लातूर ग्रामीणचे मा. आ. त्र्यंबक भिसे यांनी व्यक्त केले.

लातुर ग्रामीणचे माजी आ. धिरज विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लखमापुर माजी उपसरपंच महेश खाडप व युवक मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार चषक प्रिमीयर लिंग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा २०२५ रेणापुर तालुक्यातील लखमापुर पाटी येथे शुक्रवार दि. ४ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले होते. या उद्घाटन कार्यक्रमास रेणा कारखान्याचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील,जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष तथा कॉग्रेसचे तालुकाध्यक्ष अँड. प्रमोद जाधव , रेणा कारखान्याचे व्हा. चेअरमन अनंतराव देशमुख , कृउबाच सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती शेषेराव हाके , चन्नाबसेश्वर शिवाचार्य महाराज , संचालक कमलाकर आकनगिरे , विश्वनाथ कागले, पत्रकार धनंजय आरबुने, नितीन ढाकणे , फुले आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे , स्नेहलराव देशमुख , गोविंद पाटील , प्रविण पाटील , राजेभाऊ साळूंके,महादेव उबाळे , बालाजी हाके , अशादुल्ला सय्यद , शिवाजी चिलरगे , राजेभाऊ शेरेकर , युवराज पाटील , कुमार ससाने , व्हा चेअरमन संतोष धायगुडे , लक्ष्मण खाडप , पान २ वर

# गेवराईत श्रीराम जन्मोत्सवाचे आयोजन

समिती: मिरवणुकीत सहभागी व्हावे

पुण्यभूमी प्रतिनिधी



गेवराई:अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत असलेल्या भगवान श्रीरामांच्या जन्मतिथि निमित्त गेवराईत भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समितीतर्फे या रामनवमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाचा भाग म्हणूनच भगवान श्रीरामांची भव्य मिरवणूक काढली जाणार आहे.

श्री रामनवमीनिमित्त श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात गेवराई शहरात साजरा करण्यात येतो या जन्मोत्सवानिमित्त मोठ्या मिरवणूक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते रविवार, ६ एप्रिल रोजी रामनवमीचे औचित्य साधून दिवसभर विविध कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. सकाळ पासूनच विविध कार्यक्रमाला सुरुवात होईल. श्रीराम मंदिर परिसरात रामजन्मोत्सव पार पडेल. श्रीराम जन्मोत्सवानिमित्त भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार असून छत्रपती शिवाजी महाराज चौकातून या मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. या